## आजचे पंचांग

शनिवार, दि. २८ फेब्रुवारी २०२६
द्वितीय परार्ध, श्वेतवाराह कल्प, वैवस्वत मन्वंतर, युगाब्द ५१२७, शालिवाहन शक १९४७, विक्रम संवत २०८२, विश्वावसुनाम संवत्सर, उत्तरायण, वसंत ऋतु, फाल्गुन मास, शुक्लपक्ष,, द्वादशी रात्री ८-४४ पर्यंत दिवस नक्षत्र–पुनर्वसु सकाळी ९-३५ पर्यंत योग– सौभाग्य संध्याकाळी ५-०२ पर्यंत चंद्र रास- कर्क, सूर्य रास = कुंभ, गुरु रास= मिथुन

दैनिक

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार...

## बॉम्बस्फोटाची धमकी

**नमुंबई** : राज्यातील दोन महत्त्वाच्या ठिकाणी बॉम्बस्फोटाच्या धमकीचे ई-मेल मिळाल्याने खळबळ उडाली. विभागीय पासपोर्ट कार्यालय पुणे आणि मुंबईतील दहिसर येथील जेबीसीएन इंटरनॅशनल स्कूल यांना लक्ष्य करण्याचा इशारा देण्यात आला. पोलिसांनी तातडीने बॉम्बशोधक पथक पाठवून सखोल तपासणी केली; मात्र कोणतीही संशयास्पद वस्तू आढळली नाही. खबरदारी म्हणून शाळा बंद ठेवण्यात आली. वन

आरएनआय : MAHMAR/2021/85884 | शनिवार, दि. २८ फेब्रुवारी, २०२६ | वर्ष - १ | अंक - १५६ | पाने - ४ | पुणे/पिंपरी-चिंचवड

## सारांश वृत्त

### साखर कारखाने आर्थिक संकटात

**पुणे:** साखरेचा उत्पादन खर्च प्रतिकिलो ४१.७ रुपये असताना विक्री दर ३७ रुपयांवर घसरल्याने राज्यातील साखर कारखाने अडचणीत आले आहेत. महाराष्ट्रात शेतकऱ्यांचे 'एफआरपी'चे सुमारे ४५०० कोटी रुपये थकीत असल्याची माहिती इस्माचे महासंचालक दीपक बल्लानी यांनी दिली. २०१९ पासून 'एमएसपी' वाढवलेली नसल्याने दरात तफावत निर्माण झाली आहे. तसेच इथेनॉल खरेदी कमी झाल्याने उत्पादन क्षमतेचा पूर्ण वापर होत नाही.

### १ मार्चपासून अवैध प्रवासी वाहतुकीवर राज्यव्यापी मोहीम

**मुंबई :** राज्यात वाढत्या अवैध प्रवासी वाहतुकीवर लगाम घालण्यासाठी १ मार्चपासून विशेष मोहीम राबवण्याचे निर्देश परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिले. परवाना, विमा व फिटनेस प्रमाणपत्राशिवाय प्रवासी वाहतूक करणाऱ्या वाहनांमुळे अपघातांचा धोका वाढत असून प्रवाशांच्या सुरक्षेला धोका निर्माण होत आहे. अशा वाहनांवर कठोर कारवाई केली जाणार आहे. अवैध वाहतुकीमुळे शासनाचा महसूल घटतो तसेच महराष्ट्र राज्य परिवहन विभाग सारख्या कायदेशीर सेवांवर अन्यायकारक स्पर्धेचे ओझे येते, असेही त्यांनी स्पष्ट केले.


### 'सारथी'त यूपीएससी-एमपीएससी जागा चौपट वाढ

**राहाता :** 'सारथी' संस्थेमार्फत यूपीएससीच्या जागा १०० वरून ४०० तर एमपीएससीच्या जागा ४०० वरून १००० करण्यास राज्य सरकारने मान्यता दिली, अशी माहिती Radhakrishna Vikhe Patil यांनी दिली. मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील समितीने हा निर्णय घेतला. २०२५-२६ मध्ये ३४ योजनांसाठी २२२ कोटी खर्च करण्यात आले.

## राज्य सहकारी बँक प्रकरणी मुंबई उच्च न्यायालयाचा महत्त्वपूर्ण निर्णय

# अजितदादांसह सुनेत्रा पवार यांना क्लिन चिट!

■ दैनिक राज्य लोकतंत्र



### 'आर्थिक गुन्हे प्रकरणात क्लोजर रिपोर्ट मंजूर

● आर्थिक व्यवहार, कर्ज मंजुरी प्रक्रिया आणि लिलाव व्यवहारांची सखोल छाननी केल्यानंतर ठोस पुरावे आढळले नसल्याचे नमूद करत आर्थिक गुन्हे शाखेने सादर केलेला क्लोजर रिपोर्ट उच्च न्यायालयाने स्वीकारला आहे. त्यामुळे संबंधित प्रकरणातील गुन्हेगारी तपासाचा अध्याय जवळपास संपुष्टात आला आहे.

**मुंबई** :मुंबई राज्याच्या राजकारणात दीर्घकाळ चर्चेत राहिलेल्या महाराष्ट्र राज्य सहकारी बँक कथित घोटाळा प्रकरणात शुक्रवारी (दि. २७) महत्त्वपूर्ण न्यायालयीन घडामोड घडली. मुंबई उच्च न्यायालयाने आर्थिक गुन्हे शाखेने सादर केलेला क्लोजर रिपोर्ट स्वीकारत या प्रकरणातील तपास अधिकृतपणे बंद करण्यास मान्यता दिली. या निर्णयामुळे या प्रकरणात आरोपांच्या भोवऱ्यात अडकलेल्या सुमारे ७० जणांना मोठा दिलासा मिळाला असून त्यांना देण्यात आलेली क्लीन चिट कायम राहिली आहे. या प्रकरणात राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते अजित पवार (दिवंगत), उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, आमदार रोहित पवार यांच्यासह अनेक माजी संचालक आणि पदाधिकाऱ्यांची नावे समोर आली होती. उच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर या सर्वांविरोधातील गुन्हेगारी कारवाईचा मार्ग बंद झाला आहे. या घोटाळ्याचा तपास पुन्हा सुरू करण्यात यावा, अशी मागणी करत सामाजिक कार्यकर्ते अण्णा हजारे यांनी न्यायालयात आक्षेप अर्ज दाखल केला होता. तसेच अंमलबजावणी संचालनालयाने देखील या प्रकरणात हस्तक्षेप करण्यासाठी स्वतंत्र अर्ज सादर केला होता. ईडीने आर्थिक गैरव्यवहाराच्या अनुषंगाने तपास सुरू ठेवण्याची गरज असल्याचा युक्तिवाद केला. मात्र, न्यायालयाने उपलब्ध पुरावे आणि तपास यंत्रणांनी सादर केलेल्या अहवालांचा विचार करून दोन्ही अर्ज फेटाळून लावले. पुरेशा ठोस पुराव्यांचा अभाव असल्याचे निरीक्षण नोंदवत न्यायालयाने आर्थिक गुन्हे शाखेचा क्लोजर रिपोर्ट ग्राह्य धरला आणि तपास बंद करण्यावर शिक्कामोर्तब केले. २००७ ते २०११ या कालावधीत महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेच्या तत्कालीन संचालक मंडळाने कर्जवाटपाच्या नियमांना बगल देत साखर कारखाने आणि सूतगिरण्यांना मोठ्या प्रमाणावर कर्ज दिल्याचा आरोप करण्यात आला होता. आर्थिकदृष्ट्या अडचणीत असलेल्या आणि आधीच थकबाकीदार ठरलेल्या संस्थांना पुन्हा कर्ज देण्यात आले, असा दावा तक्रारदारांनी केला होता. यानंतर अनेक साखर कारखाने थकीत कर्जामुळे एनपीए घोषित झाले. पुढे कर्जफेड न झाल्याने या मालमत्ता लिलाव प्रक्रियेत गेल्या आणि त्या कथितपणे कवडीमोल दरात संचालक मंडळाशी संबंधित व्यक्ती किंवा त्यांच्या नातेवाईकांनी विकत घेतल्याचा आरोप विरोधकांकडून करण्यात आला. या आरोपांमुळे राज्याच्या राजकारणात मोठा वाद निर्माण झाला होता.

## सलग ५ दिवस बँका बंद?

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**मुंबई :** बँकांशी संबंधित कामे प्रलंबित असलेल्या ग्राहकांसाठी महत्त्वाची बातमी आहे. होळी सण आणि आठवड्याच्या शेवटच्या सुट्ट्यांमुळे शनिवारपासून सलग पाच दिवस बँकांचे कामकाज बंद राहण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. रिझर्व्ह बँकेने जाहीर केलेल्या सुट्ट्यांच्या वेळापत्रकानुसार शनिवार आणि रविवार या नियमित साप्ताहिक सुट्ट्यांमुळे बँका बंद राहतील. त्यानंतर २ मार्च रोजी होलिका दहन निमित्त काही राज्यांमध्ये बँकांना सुट्टी असेल. ३ मार्च रोजी धुलिवंदन आणि डोल जत्रा सणानिमित्त मुंबई, दिल्ली आणि कोलकाता यांसारख्या प्रमुख शहरांतील बँकांचे कामकाज बंद राहणार आहे. तसेच ४ मार्च रोजी होळीचा मुख्य सण असल्याने देशातील बहुतांश भागात बँकांना सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. सलग सुट्ट्यांमुळे एटीएममधील रोख रकमेची उपलब्धता कमी होण्याची शक्यता असल्याने नागरिकांनी आवश्यकतेनुसार आधीच पैसे काढून ठेवावेत, असा सल्ला देण्यात येत आहे. बँका बंद असल्या तरी एटीएम सेवा सुरू राहणार असून डिजिटल व्यवहारांवर कोणताही परिणाम होणार नाही. यूपीआयद्वारे पैशांचे व्यवहार नेहमीप्रमाणे सुरू राहतील. मात्र चेक क्लिअरन्स किंवा शाखेत प्रत्यक्ष उपस्थित राहून कराव्या लागणाऱ्या कामांसाठी ग्राहकांना सुट्टीनंतर प्रतीक्षा करावी लागेल. दरम्यान, सुट्ट्यांचे वेळापत्रक राज्यनिहाय आणि स्थानिक सणांनुसार बदलू शकते. त्यामुळे ग्राहकांनी आपल्या संबंधित बँक शाखेशी संपर्क साधून अचूक माहिती घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## दारू पिऊन वाहन चालवल्यास 'ड्रायव्हिंग लायसन' रद्द!

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**नवी दिल्ली** : मद्यपान करून वाहन चालवल्याचे दिसून आले तर संबंधिताचे ड्रायव्हिंग लायसन रद्द केले जाईल अशी घोषणा केंद्रीय महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी केली. ते आयसीआयसीयद्वारा आयोजित रस्ते सुरक्षितता कार्यक्रमात बोलत होते.

देशातील अपघातांच्या वाढत्या संख्येवर चिंता व्यक्त करून गडकरी म्हणाले, एखादी व्यक्ती मद्यपान करून गाडी चालवत असल्याचे वारंवार दिसून आले तर संबंधित चालकाचे ड्रायव्हिंग लायसन कायमस्वरूपी रद्द केले जाईल.

देशात दरवर्षी पाच लाखांहून अधिक रस्ते अपघात होतात आणि त्यात सरासरी १ लाख, ८० हजार जणांचा अंत होतो. दखलपात्र बाब म्हणजे मृतांमध्ये १८ ते ४५ वयोगटातील लोकांची संख्या ७२ टक्के आहे. तसेच या अपघातांत १८ वर्षांखालील सुमारे दहा हजार जणांचा मृत्यू होतो. सीटबेल्ट आणि हेल्मेटचा वापर न केल्यामुळे वार्षिक सुमारे ६८ हजार जणांना जीव गमवावा लागतो. अतिवेग, वाहन चालवत असताना मोबाईलवर बोलणे हीदेखील अपघातांमागील मुख्य कारणे आहेत. हे रोखण्यासाठी प्रामुख्याने युवक आणि किशोरवयीन मुलांवर विशेष लक्ष ठेवण्याच्या गरजेवर गडकरी यांनी भर दिला.

## ड्रायव्हिंग लायसन्सवर गुण प्रणाली, नियमभंग केल्यास निलंबनाची कारवाई

# देशात नवे वाहतूक नियम लागू होणार!

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली** : देशातील वाढत्या रस्ते अपघातांच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने वाहतूक नियम अधिक कडक करण्याचा निर्णय घेतला आहे. दररोज होणाऱ्या अपघातांमध्ये अनेक निष्पाप नागरिकांचा जीव जात असल्याने अपघातांचे प्रमाण कमी करण्यासाठी नवीन उपाययोजना लागू करण्यात येणार आहेत. केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी याबाबत अधिकृत घोषणा केली आहे. नव्या योजनेअंतर्गत देशभरातील वाहनचालकांसाठी ड्रायव्हिंग लायसन्सवर गुण प्रणाली (पॉइंट्स सिस्टिम) लागू केली जाणार आहे. या प्रणालीमध्ये प्रत्येक चालकाच्या लायसन्सला ठराविक गुण दिले जातील. वाहतूक नियमांचे उल्लंघन केल्यास संबंधित चालकाच्या खात्यातील गुण कमी केले जातील. चालकाचे गुण निश्चित मर्यादेपेक्षा खाली गेले, तर त्याचे ड्रायव्हिंग लायसन्स सहा महिन्यांसाठी निलंबित केले जाईल. या कालावधीत संबंधित व्यक्तीला वाहन चालवण्यास बंदी राहणार आहे. नियमांचे पालन करण्यासाठी चालकांवर शिस्तबद्ध दबाव निर्माण करण्याचा सरकारचा उद्देश असल्याचे सांगितले जात आहे. गंभीर स्वरूपाचे नियम उल्लंघन किंवा वारंवार केलेल्या चुका यावर अधिक कठोर कारवाईची तरतूद करण्यात येणार आहे. अशा प्रकरणांमध्ये संबंधित चालकाचे लायसन्स कायमस्वरूपी रद्द करण्याचा पर्यायही सरकारकडे उपलब्ध असेल. त्यामुळे भविष्यात त्या व्यक्तीला पुन्हा वाहन चालवण्याचा परवाना मिळवणे अत्यंत कठीण होऊ शकते. देशात वाढत्या वाहनसंख्येमुळे आणि वाहतूक नियमांकडे होणाऱ्या दुर्लक्षामुळे अपघातांची संख्या वाढत असल्याचे वारंवार समोर येत आहे. नव्या गुण प्रणालीमुळे चालकांमध्ये जबाबदारीची भावना वाढेल आणि नियमांचे पालन अधिक काटेकोरपणे केले जाईल, असा विश्वास केंद्र सरकारकडून व्यक्त करण्यात आला आहे. लवकरच या योजनेची अंमलबजावणी टप्प्याटप्प्याने देशभरात करण्यात येणार असून, संबंधित तांत्रिक आणि प्रशासकीय प्रक्रिया अंतिम टप्प्यात असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

### कोणत्या उल्लंघनांवर होणार कठोर कारवाई?


नव्या नियमांनुसार खालील प्रकारचे वाहतूक नियमभंग वाहनचालकांना महागात पडू शकतात:

वेगमर्यादा ओलांडून वाहन चालवणे
वाहन चालवताना मोबाईल फोनचा वापर करणे
चुकीच्या दिशेने (रॉंग साईड) वाहन चालवणे
मद्यपान करून वाहन चालवणे
अपघात कमी करण्यावर सरकारचा भर

# बदलापूरमध्ये अल्पवयीन विद्यार्थिनीचा विनयभंग; विधान परिषदेत विरोधक आक्रमक

## आरोपीवर पोक्सो व अ‍ॅट्रॉसिटी अंतर्गत गुन्हा; सरकारकडून कठोर कारवाईचा इशारा

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**मुंबई** : बुधवारी (२५ फेब्रुवारी) बदलापूर येथील एका नामांकित शाळेच्या स्कूल बसमध्ये अल्पवयीन विद्यार्थिनीचा विनयभंग झाल्याची धक्कादायक घटना घडली. पालकांच्या तक्रारीनंतर बदलापूर पश्चिम पोलिसांनी आरोपी जयेश मुने याच्याविरोधात पोक्सो व अ‍ॅट्रॉसिटी कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल करत त्याला अटक केली. न्यायालयाने आरोपीला २ मार्चपर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे.

हे प्रकरण सध्या सुरू असलेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनातही गाजले. विधान परिषदेत शिवसेना ठाकरे गटाचे आमदार सचिन अहिर यांनी हा मुद्दा उपस्थित करत राज्यात वाढत्या विनयभंगाच्या घटनांबाबत चिंता व्यक्त केली. स्कूल बससाठी ठरवलेल्या नियमांचे पालन होत नसल्याचा आरोप त्यांनी केला. आमदार अनिल परब यांनीही या गंभीर विषयावर अल्पकालीन चर्चेची मागणी केली.

यावर मंत्री शंभूराजे देसाई यांनी उत्तर देताना, विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी एसओपी तयार करण्यात आल्याचे सांगितले. बसमध्ये सीसीटीव्ही अनिवार्य करण्यासह नियमांचे काटेकोर पालन न करणाऱ्या चालक, मालक व संस्थाचालकांवर कठोर कारवाई केली जाईल, असा इशारा त्यांनी दिला.

दरम्यान, महिन्याभरात दुसऱ्यांदा अशी घटना घडल्याने बदलापूर परिसरात चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

## 'गोल्ड फील्ड प्लाझा' सोसायटीची नोंद रद्द

**पुणे :** पुणे : बेकायदेशीर पद्धतीने स्थापना व नोंदणी प्रक्रियेत दिशाभूल केल्याच्या आरोपांवरून 'गोल्ड फील्ड प्लाझा' प्रिमायसेस को-ऑप. हाऊसिंग सोसायटी लि.ची नोंद विभागीय संयुक्त निबंधकांनी रद्द केली. ससून रोड परिसरातील या इमारतीत सुमारे ५० दुकाने व ३४ कार्यालये आहेत.

भू-मालकाने दाखल केलेल्या तक्रारीनंतर महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० अंतर्गत सुनावणी झाली. पुणे सिव्हिल कोर्टाने दिलेली निषेधाज्ञा लपविण्यात आल्याचे आदेशात नमूद आहे. तसेच सामंत बिल्डकॉन कंपनी प्रा. लि. व प्रमोटर मदन सामंत यांनी महत्त्वाची माहिती दडपल्याचे आढळले.

# महादेव मुंडे हत्याप्रकरणात मोठी घडामोड

## नार्को टेस्टचा अहवाल एसआयटीकडे; न्यायालयात उघड होणार सत्य?

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**संभाजीनगर :** : परळीतील व्यापारी महादेव मुंडे हत्या प्रकरणात महत्त्वाची अपडेट समोर आली असून नार्को टेस्ट आणि ब्रेन मॅपिंगचा अहवाल विशेष तपास पथकाच्या (SIT) हाती आला आहे. हा अहवाल न्यायालयासमोर उघड करण्यात येणार असून त्यातून हत्येचे गूढ उलगडण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

२० ऑक्टोबर २०२३ रोजी परळी तहसील कार्यालयासमोर महादेव मुंडे यांची निर्घृण हत्या करण्यात आली होती. या प्रकरणात भाजप आमदार सुरेश धस यांनी १२ गुंठे जमिनीच्या वादातून हा खून झाल्याचा दावा केला आहे. वाल्मिक कराड व त्याच्या मुलाचा या प्रकरणात सहभाग असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

दरम्यान, वाल्मिक कराडचे सहकारी विजयसिंह उर्फ बाळा बांगर यांनी एसआयटीसमोर आणि कॅमेऱ्यासमोर दिलेल्या जबाबांमुळे प्रकरणाला नवे वळण मिळाले आहे. त्यांनी कराडच्या मुलाचे नाव वारंवार घेतल्याची माहिती समोर आली आहे.

प्रमुख आयपीएस अधिकारी पंकज कुमावत यांच्या नेतृत्वाखालील एसआयटीने आतापर्यंत सुमारे २०० जणांची चौकशी, १५० हून अधिक संशयितांची पडताळणी आणि ५०० पेक्षा अधिक कॉल डिटेल्स तपासले आहेत. आता नार्को अहवालातून नेमके काय समोर येते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## ८०९८ कोटींच्या तरतुदीतून २८०९ कोटींचा वापर; विधान परिषदेत दत्तात्रय भरणे यांची माहिती

# कृषी योजनांसाठी आठ महिन्यांत केवळ ३५ टक्के निधी खर्च!

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली** : मुंबई : राज्यातील कृषी विभागाच्या राज्य पुरस्कृत योजनांसाठी चालू आर्थिक वर्षातील गेल्या आठ महिन्यांत ८०९८.४१ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली होती. मात्र, त्यापैकी केवळ २८०९.८३ कोटी रुपये म्हणजेच सुमारे ३५ टक्के निधी खर्च झाल्याची माहिती कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी विधान परिषदेत दिली. आमदार अरुण लाड, परिणय फुके आणि सत्यजीत तांबे यांनी विचारलेल्या प्रश्नाला लेखी उत्तर देताना ही आकडेवारी सादर करण्यात आली.

राज्याच्या अर्थव्यवस्थेत कृषी क्षेत्राचा मोठा वाटा असतानाही निधी वितरण आणि प्रत्यक्ष खर्च यामधील तफावत या चर्चेतून अधोरेखित झाली. अनेक योजना जाहीर होतात, मोठ्या तरतुदी केल्या जातात; मात्र प्रत्यक्षात शेतकऱ्यांपर्यंत निधी पोहोचण्याचा वेग मंद असल्याचे चित्र समोर आले आहे.

### ५६ लाखांहून अधिक अर्ज, १८ लाखांना प्रत्यक्ष लाभ

२०२२ ते २०२५ या कालावधीत कृषी योजनांचा लाभ घेण्यासाठी राज्यातील ५६.१७ लाख शेतकऱ्यांनी अर्ज केले. त्यापैकी १८.४६ लाख पात्र लाभार्थ्यांना आतापर्यंत ६५२१.४१ कोटी रुपयांचे अनुदान वितरित करण्यात आले आहे. म्हणजेच अर्जदारांच्या तुलनेत प्रत्यक्ष लाभार्थ्यांचे प्रमाण लक्षणीयरीत्या कमी असल्याचे दिसते.

महाडीबीटी पोर्टलवर 'प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य' या तत्त्वानुसार ४९.७१ लाख लाभार्थ्यांची निवड करण्यात आली असून, त्यांच्यासाठी ३३३९.१८ कोटी रुपयांची देयके अपलोड करण्यात आली आहेत. संबंधित अनुदान वितरणाची प्रक्रिया सुरू असल्याचे सरकारने स्पष्ट केले आहे. मात्र, निधी उपलब्धतेच्या मर्यादा आणि प्रशासकीय प्रक्रियांमुळे प्रत्यक्ष वितरणात विलंब होत असल्याची कबुली मिळाली आहे.

### ४४ हजार कोटींची गरज

प्राप्त अर्जांच्या एकूण संख्येनुसार कृषी योजनांसाठी सुमारे ४४ हजार ६६७ कोटी रुपयांच्या निधीची आवश्यकता असल्याचे सरकारने नमूद केले आहे. उपलब्ध निधी मर्यादित असल्याने मदत टप्प्याटप्प्याने दिली जात आहे. पिक विमा, कृषी यांत्रिकीकरण, सिंचन सुविधा यांसारख्या महत्त्वाच्या योजनांचा लाभ अद्याप अनेक शेतकऱ्यांपर्यंत पोहोचलेला नाही. दरम्यान, १ डिसेंबर २०२५ पासून आतापर्यंत ९ हजार नवीन लाभार्थ्यांना ४७.७७ कोटी रुपयांचे वाटप करण्यात आल्याची माहितीही सभागृहात देण्यात आली. मात्र, अर्जांच्या तुलनेत हे प्रमाण अत्यल्प असल्याने विरोधकांनी निधी वितरणाच्या गतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. कृषी क्षेत्रातील वाढत्या खर्च, हवामान बदलाचे आव्हान आणि उत्पादन खर्चातील वाढ याच्या पार्श्वभूमीवर योजनांचा लाभ वेळेत आणि व्यापक प्रमाणात मिळणे गरजेचे आहे. अन्यथा मोठ्या तरतुदींच्या घोषणा असूनही शेतकऱ्यांना अपेक्षित दिलासा मिळणार नाही.

## मंत्र्यांनी बोलवलेल्या बैठकीला गैरहजेरी; जिल्हाधिकारी एमडी सिंग निलंबित

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई** : राज्य सरकारचे अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू असल्याने सध्या मुंबईत आमदार आणि मंत्रीमहोदयांची रेलचेल पाहायला मिळत आहेत. तर, मंत्रिमहोदयांकडून जिल्हाधिकारी व वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या बैठका घेऊन अनेक कामे मार्गी लावण्याचंही काम केलं जातंय. पर्यावरणमंत्री पंकजा मुंडे यांनीही वरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठक बोलावली होती. मात्र, पंकजा मुंडेंच्या आदेशानंतरही आयएएस अधिकारी एम. देवेंद्र सिंग हे ब्रीफिंगसाठी न आल्याने अखेर त्यांचं निलंबन करण्यात आलं आहे. याप्रकरणी, तालिका अध्यक्ष दिलीप लांडे यांनी निलंबनाचे आदेश दिले होते. त्यानुसार, सामान्य प्रशासन विभागाकडून त्यांच्यावर ही कारवाई करण्यात आली. विधानसभेतील चर्चेदरम्यान मंत्री पंकजा मुंडे यांच्या ब्रीफिंगसाठी बोलाविण्यात आल्यानंतरही एम. देवेंद्र सिंग उपस्थित राहिले नव्हते. एम. देवेंद्र सिंग हे 2011 च्या बॅचचे आयएएस अधिकारी असून सध्या महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सदस्य सचिव आहेत. त्यांच्याविरुद्ध शिस्तभंगाची कार्यवाही प्रस्तावित होती. अतिरिक्त सचिव व्ही. राधा यांच्या सहीने ही कारवाई करण्यात आली आहे. अखिल भारतीय सेवा (शिस्त व अपील) नियम, 1969 मधील नियम 3 च्या उपनियम (1) च्या कलम (a) अंतर्गत प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन एम. देवेंद्र सिंग, आयएएस , सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांना तत्काळ प्रभावाने निलंबित करीत आहे.

## संपादकीय

# अस्थिरतेची नवी सुरुवात?

**पाकिस्तानने 'गजब-लील-हक' या नावाने सुरू केलेल्या लष्करी कारवाईमुळे अफगाणिस्तानाशी असलेला तणाव नव्या टप्प्यावर पोहोचला आहे. धार्मिक प्रतीकांचा वापर, सीमावर्ती दहशतवाद आणि प्रादेशिक राजकारण यांची गुंतागुंत वाढत असताना हा संघर्ष स्थैर्यासाठी गंभीर आव्हान ठरू लागला आहे.**

पाकिस्तान-अफगाणिस्तान सीमावाद नव्या टप्प्यात प्रवेश करत आहे. 'गजब-लील-हक' या नावाने सुरू केलेल्या लष्करी कारवाईने केवळ सीमावर्ती संघर्षाला नव्हे तर धार्मिक प्रतीकांच्या आधारे युद्धनैतिकतेला नवे रूप दिले आहे. या संघर्षामागील राजकीय गणित आणि प्रादेशिक परिणाम समजून घेणे आवश्यक ठरते. दक्षिण आशियातील अस्थिरतेचे केंद्र कोणते, असा प्रश्न विचारला तर अनेक दशकांपासून उत्तर जवळपास तेच राहिले आहे, अफगाणिस्तान आणि त्याच्या सीमांवरील राजकारण. परंतु यावेळी परिस्थिती वेगळी आहे. कारण संघर्ष बाह्य शक्तींविरुद्ध नसून, एकेकाळी परस्परांच्या रणनीतीत उपयोगी ठरलेल्या दोन व्यवस्थांमध्ये आहे. पाकिस्तानने 'गजब-लील-हक' या नावाने जाहीर केलेले अभियान हे लष्करी हालचालींपेक्षा अधिक प्रतीकात्मक राजकीय विधान आहे. या नावाचा अर्थ 'सत्यासाठी ईश्वरी प्रकोप' हा योगायोग नाही. पाकिस्तानने या मोहिमेला धार्मिक वैधतेची चौकट देण्याचा प्रयत्न स्पष्ट दिसतो. आधुनिक राष्ट्रराज्य जेव्हा लष्करी कारवाईला धार्मिक आशय देऊ लागते, तेव्हा ती केवळ सीमासुरक्षेची कारवाई राहत नाही; ती अंतर्गत असुरक्षिततेचे सार्वजनिक प्रदर्शन बनते. पाकिस्तानचे नेतृत्व तालिबानविरोधातील कारवाईला नैतिक आणि धार्मिक अधिष्ठान देऊन देशांतर्गत समर्थन मजबूत करण्याचा प्रयत्न करत आहे. पाकिस्तानचा आरोप असा की अफगाणिस्तानातील तालिबान सरकार 'तहरीक-ए-तालिबान पाकिस्तान' (टीटीपी) या संघटनेला आश्रय देत आहे. ही संघटना पाकिस्तानच्या सुरक्षेसाठी दीर्घकाळ डोकेदुखी ठरली आहे. विडंबन असे की, ज्या विचारसरणीच्या गटांना पाकिस्तानने कधीकाळी सामरिक साधन म्हणून वाढवले, तेच आता त्याच्याविरोधात उभे ठाकले आहेत. 'स्ट्रॅटेजिक डेप्थ' ही पाकिस्तानची जुनी संकल्पना आता उलट दिशेने परिणाम दाखवत आहे. तालिबान सत्तेत आल्यानंतर इस्लामाबादला अपेक्षा होती की काबूलमधील नवे सरकार त्याच्या सुरक्षाविषयक चिंतेला प्रतिसाद देईल. पण तालिबान ही राष्ट्रराज्यापेक्षा चळवळ आहे; तिची निष्ठा सीमारेषांपेक्षा विचारसरणीकडे अधिक असते. परिणामी पाकिस्तानला अपेक्षित सहकार्य मिळाले नाही. उलट सीमावर्ती हल्ले आणि घुसखोरी वाढली. यामुळे पाकिस्तानच्या लष्करावर देशांतर्गत दबाव वाढू लागला. 'गजब-लील-हक' हे अभियान या दबावाचे उत्तर आहे. पाकिस्तानने संदेश स्पष्ट दिला आहे, संघर्ष आता सीमारेषेपुरता मर्यादित राहणार नाही. आवश्यक असल्यास अफगाणिस्तानच्या भूभागात घुसून कारवाई केली जाईल. परंतु अशा धोरणाचे धोके अधिक गंभीर आहेत. कारण अफगाणिस्तानात लष्करी हस्तक्षेपाचा इतिहास कोणासाठीही अनुकूल राहिलेला नाही. महासत्तांनाही येथे दीर्घकालीन स्थैर्य निर्माण करता आलेले नाही. या संघर्षाचे दुसरे परिमाण पाकिस्तानच्या अंतर्गत परिस्थितीत आहे. आर्थिक संकट, राजकीय अस्थिरता आणि वाढते दहशतवादी हल्ले यामुळे पाकिस्तानातील सत्ताकेंद्रावर दबाव आहे. अशा वेळी बाह्य शत्रूची प्रतिमा निर्माण करणे ही पारंपरिक राजकीय पद्धत असते. लष्करी कारवाई राष्ट्रीय एकात्मतेचे प्रतीक म्हणून सादर केली जाते. परंतु इतिहास सांगतो की बाह्य संघर्ष अंतर्गत समस्यांचे दीर्घकालीन उत्तर ठरत नाही. अफगाणिस्तानसाठीही परिस्थिती सोपी नाही. तालिबान सरकार आंतरराष्ट्रीय मान्यता मिळवण्यासाठी प्रयत्नशील आहे. अशा वेळी पाकिस्तानशी उघड संघर्ष त्यांच्यासाठी आर्थिक आणि राजनैतिकदृष्ट्या घातक ठरू शकतो. तरीही तालिबान आपली सार्वभौमता दाखवण्यासाठी कठोर भूमिका घेण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे सीमावर्ती चकमकी मोठ्या संघर्षात रूपांतरित होण्याचा धोका कायम आहे. या तणावाचा परिणाम केवळ दोन देशांपुरता मर्यादित राहणार नाही. मध्य आशिया, इराण, चीन आणि अगदी भारतापर्यंत त्याचे परिणाम जाणवू शकतात. चीन-पाकिस्तान आर्थिक कॉरिडॉरच्या सुरक्षेवर प्रश्नचिन्ह निर्माण होऊ शकते. स्थलांतर, अंमली पदार्थांची तस्करी आणि दहशतवादी नेटवर्क पुन्हा सक्रिय होण्याची भीती वाढू शकते. म्हणजेच हा संघर्ष प्रादेशिक स्थैर्याला आव्हान देणारा ठरू शकतो. महत्त्वाचा प्रश्न असा की पाकिस्तानची ही कारवाई रणनीतिक आहे की प्रतिक्रियात्मक? जर उद्दिष्ट केवळ टीटीपीवर दबाव आणणे असेल, तर मर्यादित कारवाई शक्य आहे. पण जर ती तालिबान शासनाला धडा शिकवण्याचा प्रयत्न असेल, तर संघर्ष दीर्घकाळ चालू शकतो. अफगाणिस्तानात सत्ता बदलवणे किंवा त्यावर प्रभाव टाकणे हे उद्दिष्ट साध्य करणे अत्यंत अवघड आहे, हे इतिहासाने पुन्हा पुन्हा दाखवले आहे. धार्मिक भाषेचा वापर करून युद्धाला नैतिक स्वरूप देणे ही आणखी धोकादायक बाब आहे. अशा भाषेत संघर्ष मांडला गेला की तडजोडीची जागा कमी होते. राजनयिक मार्ग बंद होतात आणि संघर्ष 'अस्तित्वाच्या लढाई'त रूपांतरित होतो. दक्षिण आशियासाठी ही प्रवृत्ती चिंताजनक आहे. शेवटी प्रश्न एका शब्दाचा आहे, नियंत्रण. पाकिस्तानला सीमावर्ती दहशतवाद नियंत्रित करायचा आहे; तालिबानला सार्वभौमत्व सिद्ध करायचे आहे. दोघेही शक्तीचा वापर करून उद्दिष्ट साध्य करू पाहत आहेत. परंतु शक्ती जितकी वाढते तितकी अनिश्चितताही वाढते. युद्ध सुरू करणे तुलनेने सोपे असते; ते मर्यादित ठेवणे कठीण असते. 'गजब-लील-हक' हे नाव कदाचित न्यायाच्या भाषेत मांडले गेले असेल; पण इतिहास शिकवतो की युद्धात न्यायाची व्याख्या दोन्ही बाजूंनी वेगळी असते. दक्षिण आशियातील स्थैर्याला खरा धोका सीमावादापेक्षा अविश्वासाचा आहे. आणि तो वाढत राहिला, तर हा संघर्ष केवळ सीमांवर थांबणार नाही, तो संपूर्ण प्रदेशाच्या भवितव्यावर परिणाम करेल.

# खटला, सत्ता आणि संशयाचे राजकारण!

**» दिल्लीच्या कथित दारू धोरण प्रकरणात न्यायालयाने केलेली निर्दोष मुक्तता ही तपासयंत्रणा, राजकारण आणि न्यायप्रक्रियेतील नातेसंबंधांवर नव्याने चर्चा सुरू करणारी घटना ठरली आहे. यानंतर ईडीच्या खटल्याचे भवितव्य आणि संस्थात्मक संतुलन याविषयी प्रश्न अधिक तीव्र झाले आहेत.**



दिल्लीच्या न्यायालयाने दिलेला ५९८ पानांच्या आदेशाचे राजकीय परिणाम अधिक व्यापक आहेत. गेली दोन वर्षे देशाच्या राजकीय चर्चेचा केंद्रबिंदू ठरलेले हे प्रकरण अचानक न्यायालयीन निष्कर्षाने कोसळल्यासारखे झाले. आरोपांच्या तीव्रतेइतकीच निर्दोष मुक्ततेची प्रतिध्वनीही मोठी असते. कारण न्यायालयीन निर्णय हा केवळ व्यक्तींविषयी नसतो; तो संस्थांबद्दलही भाष्य करत असतो. या निर्णयानंतर उभा राहणारा पहिला प्रश्न म्हणजे अंमलबजावणी संचालनालयाच्या मनी लॉँड्रिंग प्रकरणाचे भवितव्य. भारतीय कायद्यातील मनी लॉँड्रिंगविरोधी चौकट ही जाणूनबुजून गुंतागुंतीची ठेवली गेली आहे. २००२ च्या मनी लॉँड्रिंग प्रतिबंधक कायद्यानुसार ईडीचा गुन्हा स्वतंत्र मानला जातो, परंतु तो पूर्णपणे स्वायत्त नसतो. त्याची पायाभरणी 'पूर्वनिर्धारित गुन्ह्या'वरच उभी असते. म्हणजेच मूळ गुन्हा अस्तित्वात नसेल, तर त्यातून निर्माण झालेल्या कथित आर्थिक लाभांचाही आधारच उरत नाही. याच ठिकाणी न्यायालयीन तत्त्वज्ञान आणि तपासयंत्रणांची कार्यपद्धती यांचा संघर्ष दिसतो. तपास संस्था अनेकदा असा युक्तिवाद करतात की आर्थिक व्यवहारांचा मागोवा घेणे हे प्राथमिक गुन्ह्यापासून स्वतंत्र असते. परंतु न्यायालयांनी सातत्याने अधोरेखित केले आहे की 'गुन्ह्यातून मिळालेला पैसा' हा गुन्हा सिद्ध झाल्याशिवाय अस्तित्वात मानता येत नाही. अन्यथा संशयच पुरावा ठरेल. सर्वोच्च न्यायालयाने विजय मदनलाल चौधरी प्रकरणात दिलेला निर्णय या संदर्भात मार्गदर्शक ठरतो. न्यायालयाने स्पष्ट केले की अनुसूचित गुन्हाच जर न्यायालयीन कसोटीवर टिकला नाही, तर मनी लॉँड्रिंगचा आरोपही टिकू शकत नाही. ही भूमिका केवळ कायदेशीर बारकावा नाही; ती राज्यसत्तेच्या मर्यादांची आठवण आहे. अन्यथा कोणत्याही व्यक्तीवर प्रथम आरोप, नंतर आर्थिक चौकशी आणि अखेरीस दीर्घकालीन कायदेशीर दडपण अशी प्रक्रिया सहज शक्य झाली असती. या प्रकरणाने भारतीय लोकशाहीतील आणखी एक वास्तव अधोरेखित केले आहे. तपासयंत्रणा आणि राजकारण यांच्यातील सीमारेषा सार्वजनिक धारणा पातळीवर धूसर होत चालली आहे. आरोप झाले की दोषी ठरल्यासारखी प्रतिमा निर्माण होते आणि न्यायालयीन निर्णय येईपर्यंत राजकीय नुकसान घडून गेलेले असते. न्यायालय निर्दोष मुक्तता देते तेव्हा कायदेशीर न्याय मिळतो; पण राजकीय न्याय परत मिळतोच असे नाही. यामुळे प्रश्न केवळ एका पक्षाचा किंवा नेत्याचा राहत नाही. तपासयंत्रणांवरील विश्वास हा लोकशाहीतील अत्यावश्यक घटक असतो. त्या विश्वासाला धक्का बसला तर कायदा अंमलबजावणीपेक्षा राजकीय साधन म्हणून यंत्रणांकडे पाहिले जाऊ लागते. दीर्घकालीन दृष्टीने हे कोणत्याही सत्ताधाऱ्यांसाठी धोकादायक ठरते. कारण सत्तांतरानंतर त्याच यंत्रणा उलट दिशेने वापरल्या जाऊ शकतात. सीबीआयने उच्च न्यायालयात अपील करण्याचा निर्णय घेतला आहे. कायदेशीरदृष्ट्या हा स्वाभाविक मार्ग आहे. परंतु अपील प्रक्रियेदरम्यान एक महत्त्वाचा मुद्दा समोर राहील: ट्रायल कोर्टाच्या निर्दोष मुक्ततेला स्थगिती मिळते का? कारण स्थगिती नसल्यास ईडीच्या खटल्याचे नैतिक आणि कायदेशीर अधिष्ठान दोन्ही कमकुवत होते. या साऱ्या घडामोडींमध्ये भारतीय न्यायव्यवस्थेची एक वैशिष्ट्यपूर्ण ताकद दिसते. राजकीय वाद कितीही तीव्र असले तरी अंतिम शब्द न्यायालयाचाच असतो. तो उशिरा येतो, वादग्रस्त ठरतो, टीकेचा विषय बनतो; तरीही संस्थात्मक स्थैर्य याच प्रक्रियेतून निर्माण होते. तथापि, न्यायालयीन निर्दोष मुक्तता म्हणजे प्रशासनिक आत्मपरीक्षण आपोआप होईल असे नाही. तपास कसा झाला, आरोपपत्रांची गुणवत्ता काय होती, पुराव्यांचे मूल्यमापन योग्य होते का, या प्रश्नांची उत्तरे संस्थांनी स्वतः शोधावी लागतील. अन्यथा प्रत्येक मोठ्या प्रकरणानंतर आरोप आणि निर्दोष मुक्तता यांचा चक्राकार खेळ सुरूच राहील. भारतीय लोकशाहीत कायदा, सत्ता आणि सार्वजनिक मत या तीन घटकांमध्ये सतत ताण असतो. हा ताण नकारात्मक नसतो; तोच संतुलन निर्माण करतो. मात्र त्या संतुलनासाठी एक अट आवश्यक असते आरोप आणि शिक्षा यांच्यामध्ये पुराव्याची भक्कम साखळी असणे. दिल्लीतील या निर्णयाने अखेरीस एक साधा पण अस्वस्थ करणारा प्रश्न पुन्हा समोर आणला आहे: न्यायालयीन प्रक्रियेचा उद्देश सत्य शोधणे आहे की राजकीय कथानकांना वैधता देणे? लोकशाहीची विश्वासार्हता या प्रश्नाच्या उत्तरावरच अवलंबून असते. कारण न्यायालयीन निर्दोष मुक्तता ही केवळ एखाद्या व्यक्तीची सुटका नसते; ती राज्यसत्तेलाही दिलेली घटनात्मक आठवण असते की अधिकारांइतकीच जबाबदारीही मोठी असते.

# पुण्यात पोलिसांची धडक कारवाई; ९ सराईत गुंड तडीपार

## बिबवेवाडी, आंबेगाव व मार्केटयार्ड परिसरातील दहशत रोखण्यासाठी शहर व जिल्ह्याबाहेर हद्दपार

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**पुणे :** शहरातील बिबवेवाडी, आंबेगाव आणि मार्केटयार्ड परिसरात दहशत माजवणाऱ्या नऊ सराईत गुंडांवर पुणे पोलिसांनी मोठी कारवाई करत त्यांना दोन वर्षांसाठी पुणे शहर व जिल्ह्याबाहेर तडीपार करण्याचे आदेश दिले आहेत. परिमंडळ दोनचे पोलीस उपायुक्त मिलिंद मोहिते यांच्या आदेशानुसार ही कारवाई करण्यात आली असून, शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्याच्या दृष्टीने हा निर्णायक टप्पा मानला जात आहे.

तडीपार करण्यात आलेल्या आरोपींवर खुनाचा प्रयत्न, जबरी चोरी, बेकायदा शस्त्र बाळगणे, गंभीर दुखापत, धमकी देणे व मारहाण यांसारखे गंभीर गुन्हे दाखल आहेत. या गुन्ह्यांमुळे संबंधित परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. वाढत्या गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी आणि नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण करण्यासाठी पोलिस प्रशासनाने कठोर पाऊल उचलले आहे.

तडीपार करण्यात आलेल्यांमध्ये जालिंदर मसा मोरे (अप्पर इंदिरानगर), अण्णा उर्फ गणराज सुनिल ठाकर (अप्पर बिबवेवाडी), ओंकार लक्ष्मण सणस (बिबवेवाडी), राजु महादेव डेंगळे (सुखसागर नगर) यांच्यासह अन्य सहकाऱ्यांचा समावेश आहे. सार्वजनिक ठिकाणी दहशत निर्माण करणे, नागरिकांना धमकावणे आणि हिंसक कृत्ये करणे हे त्यांच्यावरचे प्रमुख आरोप आहेत.

या कारवाईमुळे स्थानिक स्तरावर गुन्हेगारी टोळ्यांवर पोलिसांचा कठोर संदेश गेला असून, भविष्यात अशा प्रकारच्या गैरकृत्यांना आळा बसण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. अनेक नागरिकांनी पोलिसांच्या या निर्णयाचे स्वागत करत शहरातील शांतता आणि सुरक्षिततेसाठी हे पाऊल महत्त्वाचे असल्याचे मत व्यक्त केले.

पोलिस आयुक्त अमितेशकुमार यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आलेल्या या कारवाईमुळे शहरातील गुन्हेगारीवर नियंत्रण ठेवण्यास मदत होईल, असा विश्वास पोलिस प्रशासनाने व्यक्त केला आहे. दरम्यान, पुढील काळातही अशाच पद्धतीने सराईत गुन्हेगारांविरोधात कठोर कारवाई सुरू राहणार असल्याचे संकेत पोलिसांकडून देण्यात आले आहेत.

# पुणे जिल्ह्यातील २४ आमदारांना स्थानिक विकास निधीचा मार्ग मोकळा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**+ 'ई समर्थ' पोर्टलवर पहिल्या टप्प्यात ५० कोटी उपलब्ध; विकासकामांना गती मिळणार**

**पुणे :** आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत पुणे जिल्ह्यातील २४ आमदारांना निधी उपलब्ध करून देण्याचा निर्णय अखेर अर्थ खात्याने मंजूर केला आहे. पहिल्या टप्प्यात ५० कोटी रुपयांचा निधी 'ई समर्थ' पोर्टलवर उपलब्ध करून देण्यात आला असून, त्यामुळे प्रलंबित विकासकामांना आता गती मिळणार आहे.

खासदारांप्रमाणे आमदारांनाही थेट स्थानिक विकास निधी मिळावा यासाठी दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी 'ई समर्थ' पोर्टल विकसित करण्याचे निर्देश दिले होते. या प्रणालीद्वारे कामांचे स्वरूप तपासून पारदर्शक पद्धतीने निधी वितरित करण्याचा उद्देश आहे. निधीचा अपव्यय टाळणे आणि पात्र विकासकामांना प्राधान्य देणे हा यामागील मुख्य हेतू आहे. राज्यातील इतर जिल्ह्यांतील आमदारांना यापूर्वीच प्रत्येकी पाच कोटींचा निधी वितरित करण्यात आला होता. मात्र, पुणे जिल्ह्यात 'ई समर्थ'चा प्रायोगिक प्रकल्प राबविला जात असल्याने येथील आमदारांना निधी मिळण्यात विलंब झाला होता. आता निधी उपलब्ध झाल्याने जिल्ह्यातील विविध विकासकामांना चालना मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

# ऑनलाईन फूड डिलिव्हरी कंपन्यांच्या 'डार्क स्टोअर'ची विशेष तपासणी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** ऑनलाईन पद्धतीने अन्नपदार्थ पुरविणाऱ्या कंपन्यांच्या गोदामांवर (डार्क स्टोअर्स) तातडीने विशेष तपासणी करण्याचे निर्देश लागू करण्याची मागणी महाराष्ट्र विधानसभा मध्ये करण्यात आली आहे. पुणे आणि इतर शहरांतील ग्राहकांकडून ऑनलाईन मागविलेले काही अन्नपदार्थ टिकाऊपणाची मुदत संपलेले निघत असल्याच्या तक्रारी झाल्याचा उल्लेख आमदार सिद्धार्थ शिरोळे यांनी विधानसभेत केला.

शिरोळेंनी ऑनलाईन फूड कंपन्यांच्या गोदामांत साठवणूक व्यवस्था, मुदतबाह्य अन्नपुरवठा आणि वेळोवेळी होणाऱ्या तपासणीत आढळणाऱ्या त्रुटींबाबत प्रश्न उपस्थित केला. सन २००६ च्या अन्न सुरक्षा कायद्यानुसार मुदत संपलेले अन्न विकणे हा गंभीर गुन्हा आहे आणि याबाबत किती कंपन्यांविरुद्ध कारवाई झाली आहे, हे स्पष्ट करण्याची मागणी त्यांनी केली. खडकवासला मतदारसंघाचे आमदार भीमराव तापकीर यांनीही तारांकित प्रश्नाद्वारे यावर चिंता व्यक्त केली. अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवळ यांनी ब्लिंकिटच्या पिंपरी गुरव येथील कार्यालयाची तपासणी केल्याबद्दल माहिती दिली, जिथे ग्राहकांच्या तक्रींनुसार तपासणी करण्यात आली होती. तपासणीवेळी मुदतबाह्य अन्नाचा साठा आढळून आला नाही, मात्र कंपनीच्या अभिलेखांची तपासणी केल्यानंतर मुदतबाह्य अन्न वितरण झाल्याची माहिती मिळाली. त्या आधारावर कंपनीला सुधारणा नोटीस दिली गेली.

# मराठी भाषा गौरव दिनी 'माय मराठीची गौरवगाथा'चा सुरेल जल्लोष!

## तारांकित प्रश्नानंतर उघड झाली धक्कादायक आकडेवारी; २०२५ मध्ये २३९ कोटींचा मुद्देमाल जप्त

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**मुंबई :** पिंपरी चिंचवड महापालिकेच्या कार्यक्रमात शाहिरी-लोकगीतांतून संस्कृतीला मानवंदना

पिंपरी, दि. २७ फेब्रुवारी २०२६ : मराठी भाषा गौरव दिनानिमित्त पिंपरी-चिंचवड महानगर पालिकेच्या वतीने आयोजित 'माय मराठीची गौरवगाथा' हा सांस्कृतिक सोहळा चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे नाट्यगृह येथे उत्साहात रंगला. खंजिरीच्या ठेक्यावर दणदणारी शाहिरी, लोकसंगीताच्या सुरेल लहरी आणि ओजस्वी शब्दांनी सभागृह अक्षरशः दुमदुमले.

महापालिकेच्या पुढाकाराने तसेच श्री भैरवनाथ सार्वजनिक ग्रंथालय, भोसरी आणि हुतात्मा चापेकर सार्वजनिक ग्रंथालय, चिंचवड यांच्या सहकार्याने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. लोकशाहीर विठ्ठल उमप थिएटरतर्फे सादर झालेल्या या कार्यक्रमात संदेश विठ्ठल उमप आणि शाहीर पृथ्वीराज माळी यांनी आपल्या दमदार आवाजातून मराठी संस्कृतीचा जागर घडवला. 'जय जय महाराष्ट्र माझा' या गीताने कार्यक्रमाची सुरुवात होताच महाराष्ट्रप्रेमाची लहर उसळली. 'जयोस्तुते', 'हे सुरानो चंद्र व्हा', 'मी डोलकर', 'नेसते पैठणी चोळी', 'शूर आम्ही सरदार', 'लग्नाला चला', 'म्यानातून उसळे' आदी गीतांनी लोकसंस्कृतीची विविधरंगी झलक साकारली. 'ने मजसी ने' या भावपूर्ण गीताने समारोप होताच सभागृह टाळ्यांच्या कडकडाटाने दुमदुमले.

शाहीर पृथ्वीराज माळी यांनी 'पोवाडा महाराष्ट्राचा', 'जोगवा', 'माझ्या भीमराया' यांसारख्या गीतांतून सामाजिक जाणीव आणि सांस्कृतिक अस्मितेचा प्रभावी संगम घडवला. ढोलकीच्या ठेक्यावर आणि वाद्यवृंदाच्या सुरेल साथीत कार्यक्रमाला विशेष रंगत आली.

या सोहळ्यास महापालिकेचे अधिकारी, मान्यवर आणि रसिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. मराठी भाषेचा ऐतिहासिक वारसा, परंपरा आणि अस्मिता यांचा सुरेल आविष्कार अनुभवताना उपस्थितांच्या मनात अभिमानाची दीपमाळ प्रज्वलित झाली.

मराठी भाषा गौरव दिनाचे औचित्य साधून प्रेक्षागृहात पुस्तक प्रदर्शनाचे आयोजनही करण्यात आले होते. साहित्यप्रेमींनी त्याला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. सुर, ताल आणि शब्दांच्या संगमातून साकारलेला हा कार्यक्रम म्हणजे मराठी संस्कृतीच्या वैभवाचा साक्षात उत्सव ठरला.

## युवकांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन व संविधानिक मूल्यांची रुजवणूक गरजेची; माता रमाई स्मारकाचे भूमिपूजन ११ एप्रिलला – महापौर रवि लांडगे

# फुले-आंबेडकर विचार प्रबोधन पर्वासाठी सामाजिक संघटनांची महत्त्वपूर्ण बैठक

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पिंपरी :** क्रांतिसूर्य महात्मा जोतीराव फुले आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त आयोजित करण्यात येणाऱ्या विचार प्रबोधन पर्वाच्या नियोजनासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने शहरातील सामाजिक संघटनांची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. महापालिकेच्या मुख्यालयातील मधुकर पवळे सभागृहात महापौर रवि लांडगे यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक झाली.

यावेळी बोलताना महापौर लांडगे यांनी फुले-आंबेडकरांच्या विचारांची आजच्या काळातील उपयुक्तता अधोरेखित केली. सामाजिक समता, शिक्षणाचे महत्त्व, संविधानिक मूल्यांची जोपासना आणि युवकांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन रुजविणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. विचार प्रबोधन पर्वाच्या माध्यमातून व्याख्याने, परिसंवाद, ग्रंथप्रदर्शने, चित्रफिती, नाट्यप्रयोग तसेच शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी विशेष उपक्रम राबविण्याचा प्रस्ताव त्यांनी मांडला.

बैठकीस उपमहापौर शर्मिला बाबर, सभागृह नेते प्रशांत शितोळे, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, नगरसदस्य धर्मपाल तंतरपाळे, डॉ. सुहास कांबळे, सारिका मासुळकर, माजी नगरसेवक मारुती भापकर, अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे, उपायुक्त अण्णा बोदडे, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक तसेच शहरातील विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

विचार प्रबोधन पर्व हे केवळ औपचारिक कार्यक्रम न राहता सर्वसामान्य नागरिकांपर्यंत विचारांची चळवळ पोहोचवणारे प्रभावी व्यासपीठ ठरावे, यासाठी सविस्तर चर्चा करण्यात आली. स्थानिक पातळीवरील अभ्यासक, वक्ते व कार्यकर्त्यांना संधी देणे, महिलांचा व युवकांचा सहभाग वाढविणे, संयुक्त नियोजन समिती स्थापन करणे तसेच कार्यक्रमांचे वेळापत्रक वेळेत जाहीर करणे याबाबत सूचना मांडण्यात आल्या. आधुनिक माध्यमांचा वापर करून व्यापक प्रसिद्धी देण्यावरही भर देण्यात आला.

दरम्यान, बैठकीत त्यागमूर्ती माता रमाई भीमराव आंबेडकर स्मारकाच्या उभारणीचा मुद्दा उपस्थित करण्यात आला. सामाजिक व ऐतिहासिक दृष्टिकोनातून माता रमाई यांच्या कार्याचे महत्त्व अधोरेखित करत स्मारकाच्या कामास तातडीने सुरुवात करण्याची मागणी करण्यात आली. यास प्रतिसाद देताना महापौर रवि लांडगे यांनी शहरातील नागरिकांच्या भावना लक्षात घेऊन येत्या ११ एप्रिल रोजी माता रमाई आंबेडकर स्मारकाचे भूमिपूजन करण्यात येणार असल्याची घोषणा केली.

विचार प्रबोधन पर्वाच्या यशस्वी आयोजनासाठी सर्वांनी एकत्रितपणे काम करण्याचा निर्धार व्यक्त केला.

# रामवाडी मेट्रो स्थानकाजवळील बसथांबा हलवला; प्रवाशांची गैरसोय

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**+ दररोज १५-२० हजार प्रवाशांना पायपीट; रिक्षांच्या रांगा कायम, नागरिकांचा सवाल**

**पुणे :** रामवाडी मेट्रो स्थानकाखालील पीएमपी बसथांबा वाहतूक कोंडीचे कारण देत सुमारे २०० मीटर पुढे हलवण्यात आला आहे. या निर्णयामुळे मेट्रोने प्रवास करून पुढे बसने जाणाऱ्या हजारो प्रवाशांना दररोज पायपीट करावी लागत असून ज्येष्ठ नागरिक, महिला व सामानासह प्रवास करणाऱ्यांची मोठी गैरसोय होत आहे.

नगर रस्ता परिसरातील विमाननगर, वडगाव शेरी, चंदननगर, खराडी, वाघोली येथील नागरिक मोठ्या प्रमाणात रामवाडी स्थानकातून प्रवास करतात. दररोज सुमारे १५ ते २० हजार प्रवासी या स्थानकाचा वापर करतात. पार्किंगची मर्यादित सुविधा असल्याने अनेक जण पीएमपीवर अवलंबून आहेत. यापूर्वी स्थानकाखालीच बसथांबा असल्याने सहज जोडणी मिळत होती; मात्र आता बसपर्यंत पोहोचण्यासाठी किमान २०० मीटर चालावे लागते. दरम्यान, स्थानकाबाहेर रिक्षा व कॅबच्या रांगा कायम असल्याने कोंडीस केवळ बसथांबाच कारणीभूत होता का, असा प्रश्न नागरिक उपस्थित करत आहेत. काही रिक्षाचालकांकडून अवाजवी भाडे आकारले जात असल्याच्या तक्रारीही आहेत. सार्वजनिक वाहतुकीला प्राधान्य देण्याऐवजी बसथांबा हलवणे योग्य आहे का, असा सवाल प्रवाशांकडून केला जात आहे.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### उसने पैसे न दिल्याच्या रागातून मेकॅनिकवर हल्ला

**लोणी काळभोर :** दारू पिण्यासाठी उसने पैसे देण्यास नकार दिल्याचा राग मनात धरून मेकॅनिक प्रदीप सूर्यकांत काळभोर (वय 35) यांच्यावर कदमवाकवस्ती (ता. हवेली) येथील इंदिरानगर चौकात रविवारी रात्री साडेअकराच्या सुमारास हल्ला करण्यात आला. आरोपींनी शिवीगाळ करत लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. भांडण सोडवण्यासाठी धावून आलेल्या त्यांच्या 68 वर्षीय आई प्रमिला काळभोर यांनाही मारहाण करण्यात आली. दगडाने डोक्यात वार केल्याने प्रदीप गंभीर जखमी झाले. या प्रकरणी आशिष झेंडे व अन्य तिघांविरोधात लोणी काळभोर पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### दत्त मंदिर चौकात चार महिलांचा भररस्त्यात धिंगाणा

**लोणी काळभोर :** गर्दीच्या वेळी भररस्त्यात आरडाओरडा, शिवीगाळ आणि झोंबाझोंबी करत चार महिलांनी दत्त मंदिर चौकात धिंगाणा घातल्याची घटना मंगळवारी (ता. 24) सायंकाळी सव्वासातच्या सुमारास घडली. या प्रकारामुळे काही काळ तणाव निर्माण होऊन वाहतूकही खोळंबली. मुनस अय्यु इराणी (35), सीमु मोसन इराणी (50), फातीमा मन्सुर जाफरीन (50) आणि फिजा ऊर्फ मम्माई मोहंमद जाफरीन (30, सर्व रा. पठारे वस्ती, लोणी काळभोर) अशी आरोपींची नावे आहेत. महिला पोलीस अंमलदार माधुरी चौधरी यांच्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल झाला आहे.घरगुती वादातून सुरू झालेला हा प्रकार पोलीस ठाण्याकडे येताना रस्त्यावरच चिघळला. पोलिसांनी तातडीने हस्तक्षेप करून भांडण सोडवले. भारतीय न्यायसंहिता कलम 194(2) अन्वये कारवाई करण्यात आली आहे.

### १४१ गावांचा ताण कमी करण्यासाठी मोजणी कार्यालयाचे विभाजन

# हवेलीतील जमीन व्यवहारांसाठी सरकारचा मोठा निर्णय!

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**हवेली :** तालुक्यातील वाढते नागरीकरण, आयटी पार्क्सची उभारणी, रिंगरोडसारखी मोठी पायाभूत कामे आणि वाढती गुंतवणूक यामुळे जमीन व्यवहारांना अभूतपूर्व वेग आला आहे. शेतीजमीन, एनए प्लॉट, गृहनिर्माण प्रकल्प तसेच औद्योगिक वापरासाठी मोठ्या प्रमाणावर खरेदी-विक्री होत असल्याने जमिनींचे दर गगनाला भिडले आहेत. मात्र या वाढत्या व्यवहारांसोबत सीमांकन, मोजणी, हक्कनिश्चिती आणि नोंद दुरुस्ती यांसारख्या प्रक्रियांवरील ताणही प्रचंड वाढला आहे.

सध्या हवेली उपअधीक्षक, भूमिअभिलेख (मोजणी) कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात तब्बल १४१ गावे येतात. दरवर्षी सुमारे ५,००० ते ६,००० अर्ज या कार्यालयात दाखल होतात. इतक्या मोठ्या कार्यभारामुळे अनेक प्रकरणे महिनोन्महिने प्रलंबित राहतात. परिणामी जमीनमालक, गुंतवणूकदार आणि बांधकाम व्यावसायिकांना विलंबाचा सामना करावा लागत आहे.

ही परिस्थिती लक्षात घेऊन भूमिअभिलेख विभागाने हवेली मोजणी कार्यालयाचे विभाजन करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. यासंदर्भातील प्रस्ताव लवकरच राज्य शासनाकडे पाठवला जाणार असून पुढील दोन ते तीन महिन्यांत नवीन उपअधीक्षक कार्यालय सुरू होण्याची शक्यता आहे. नव्या कार्यालयामुळे १४१ गावांपैकी सुमारे निम्म्या गावांचा कारभार स्वतंत्रपणे हाताळला जाईल, त्यामुळे अर्ज निकाली काढण्याचा वेग वाढेल.

मोजणीनंतर 'क' प्रत देणे, सीमारेषा निश्चित करणे, जमिनीच्या हक्कांबाबत सुनावण्या घेणे तसेच वादग्रस्त प्रकरणांवर निर्णय देणे ही या कार्यालयाची प्रमुख जबाबदारी आहे. नव्या कार्यालयात एक उपअधीक्षक, शिरस्तेदार, भूकरमापक आणि इतर आवश्यक प्रशासकीय कर्मचारी नियुक्त केले जाणार आहेत.

यापूर्वी हवेली तहसील कार्यालयाचे विभाजन करून पिंपरी-चिंचवड आणि लोणी काळभोर येथे स्वतंत्र कार्यालये सुरू करण्यात आली होती. त्याच धर्तीवर हा निर्णय घेतला गेला असून प्रशासनाची कार्यक्षमता वाढवण्याचा उद्देश आहे. जमीनविषयक वाद हे केवळ कायदेशीर प्रश्न नसून ते थेट गुंतवणूक, बांधकाम प्रकल्प आणि नागरिकांच्या मालकीहक्कांशी निगडित असतात. जलद मोजणी, अचूक नोंदी आणि स्पष्ट सीमांकन यामुळे व्यवहारांना गती मिळेल, वादांची संख्या कमी होईल आणि प्रशासनावरील ताण हलका होईल. हवेलीतील झपाट्याने वाढणाऱ्या शहरीकरणाच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय अत्यंत महत्त्वाचा आणि दिलासा देणारा ठरणार आहे.

# विज्ञान म्हणजे विचार करण्याची वैज्ञानिक पद्धत – डॉ. प्रतिक मुणगेकर

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**राजगुरुनगर :** ओतूर, दि. २७ : राष्ट्रीय विज्ञान दिनाचे औचित्य साधून स्वरूप स्पेस अँड इनोव्हेशन सेंटर (एमएसएसआयसी), नारायणगाव यांच्या वतीने ग्राम विकास मंडळ संचलित चैतन्य विद्यालय, ओतूर येथे आंतरराष्ट्रीय ख्यातीचे शास्त्रज्ञ, संशोधक व शिक्षणतज्ज्ञ डॉ. प्रतिक मुणगेकर यांचे विज्ञान विषयक व्याख्यान आयोजित करण्यात आले. सुमारे १४५० विद्यार्थ्यांनी या व्याख्यानाचा लाभ घेतल्याची माहिती मुख्याध्यापिका राजश्री भालेकर यांनी दिली.

"विज्ञान म्हणजे फक्त पाठ्यपुस्तकातील धडे नसून ती विचार करण्याची वैज्ञानिक पद्धत आहे," असे सांगत डॉ. मुणगेकर यांनी विद्यार्थ्यांना जिज्ञासा, परिश्रम आणि आत्मविश्वास यांचे महत्त्व पटवून दिले. जागतिक कीर्तीचे शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर यांच्यासारखे गुरु लाभल्यामुळे संशोधन कार्यात दिशा मिळाल्याचे त्यांनी नमूद केले. परिस्थिती कधीही अडथळा ठरत नाही; जिद्द, सचोटी आणि सातत्य असल्यास ध्येय साध्य करता येते, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

विद्यार्थ्यांना वाचनाची सवय लावण्याचे, स्मार्ट वर्क करण्याचे आणि ज्ञानाचा उपयोग प्रत्यक्ष कृतीत करण्याचे आवाहन त्यांनी केले. "मोठी स्वप्ने पाहा, शांततेत काम करा, नक्कल टाळा, अपयश आले तरी हार मानू नका," असा मोलाचा संदेश त्यांनी दिला. शाळेतील विविध उपक्रमांत सहभागी झाल्याने बौद्धिक विकास होतो, असेही त्यांनी सांगितले.

कार्यक्रमास ग्राम विकास मंडळाचे उपाध्यक्ष प्रभाकर तांबे, डॉ. तानाजी वामन, रतिलाल बाबेल, राजेंद्र डुंबरे यांच्यासह शिक्षकवर्ग व मान्यवर उपस्थित होते. प्रास्ताविक विशाल चौधरी यांनी केले, सूत्रसंचालन मिलिंद खेत्री यांनी तर आभार प्रदर्शन प्रदीप गाढवे यांनी मानले.

# "माझ्या मराठीची गोडी साता समुद्रापार नेऊ या" – संपत माने

### गाडगे महाराज विद्यालयात मराठी राज्यभाषा दिन उत्साहात साजरा

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**ओतूर :** ज्ञानपीठ पुरस्कार विजेते कवी वि. वा. शिरवाडकर (कुसुमाग्रज) यांच्या जयंतीनिमित्त गाडगे महाराज विद्यालयात मराठी राज्यभाषा दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. मराठी भाषा ही केवळ संवादाचे माध्यम नसून ती आपली संस्कृती, परंपरा आणि ओळख आहे, असे प्रतिपादन विद्यालयाचे मुख्याध्यापक संपत माने यांनी अध्यक्षीय भाषणात केले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी संस्थेचे आधारवड वै. प्र. पाटील तसेच कवी वि. वा. शिरवाडकर यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. त्यानंतर इयत्ता नववीच्या विद्यार्थ्यांनी "लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी, जाहलो खरेच धन्य ऐकतो मराठी" ही कविता सादर करून उपस्थितांची दाद मिळवली. माध्यमिक आश्रम शाळेतील विद्यार्थिनींनी "गे माय भूमी" या कवितेच्या सादरीकरणातून मराठी भाषेचा गौरव व्यक्त केला.

मराठी भाषेच्या जतन व संवर्धनाचा संदेश देत करण डोईफोडे, ज्योती वायाळ, योगिता तुपे, भारती भोर, श्रवण बनकर, श्लोक पानसरे, राघव पाटील, श्लोक शेटे, श्वेता पानसरे, विपुल पंडित, सुरज मुठे, सत्यम नाडेकर, अनन्या टिकेकर, सृष्टी डुंबरे, आर्या घुले, सुप्रिया वळे, मनस्वी सोनवणे, भाग्यश्री हाडवळे व प्रथमेश सोनवणे यांनी मनोगते व्यक्त केली. मनस्वी सोनवणे हिने ३ ऑक्टोबर २०२४ रोजी मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याचा उल्लेख करत "माझ्या मराठीचा बोलू कौतुके, अमृता तेही पैजा जिंके" असे म्हणत अभिमान व्यक्त केला.

शिक्षक प्रतिनिधी राजू ठोकळ व कैलास महाजन यांनीही मनोगते व्यक्त केली.

कार्यक्रमास मराठी विभागप्रमुख रामदास बगाड, बाबुलाल थोरात, सुमन घाडगे, प्रदीपकुमार मिरगे, सुनील पोकळे, भानुदास ढोबळे, निवृत्ती कुकडे, सुनील खूपसे, सचिन मुखरे, संजय मेटकरी, मनीषा ठाकरे, अच्युत निकरड आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन भावेश पाटील तर आभारप्रदर्शन आर्यन डुंबरे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी आनंदा वळे, समाधान लवंगडे व सत्यवान भरणकर यांनी सहकार्य केले.

# एकल महिलांचा हळदी-कुंकू समारंभात गुलाब रोपट्याने सन्मान




■ दैनिक राज्य लोकतंत्र

**आंबेगाव :** आंबेगाव तालुक्यातील पहाडदरा ग्रामपंचायतीत मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत एकल महिलांसाठी विशेष सन्मान समारंभ आयोजित करण्यात आला. या उपक्रमात गावातील एकल महिलांना हळदी-कुंकू समारंभाच्या माध्यमातून सन्मानित करण्यात आले.

**पहाडदरा ग्रामपंचायतीचा नाविन्यपूर्ण उपक्रम**

प्रत्येक महिलेला गुलाबाचे रोपटे देऊन गौरव करण्यात आला.

कार्यक्रमास पंचायत समितीच्या नवनिर्वाचित सदस्या अंकिता वाळूंज यांनी आवर्जून उपस्थिती लावली. ग्रामपंचायत सरपंच मच्छिंद्र वाघ, सदस्य राजश्री वाघ, ग्रामपंचायत अधिकारी सोनाली जाधव, आशा सेविका, अंगणवाडी सेविका, सीआरपी तसेच टीव्हीएस कंपनीच्या प्रतिनिधी सिंधू वायकर यांचे सहकार्य लाभले. गावातील महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. समाजातील एकल महिलांना सन्मानाची व आत्मविश्वासाची जाणीव करून देण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. या नाविन्यपूर्ण उपक्रमाचे परिसरात कौतुक होत आहे.

# ऊसाच्या वाढ्यांना चढा भाव; हिरव्या चाऱ्याच्या टंचाईने मागणी वाढली

### लोणी-धामणी परिसरात खरेदी-विक्री जोमात; दुग्ध उत्पादक शेतकरी चिंतेत

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**आंबेगाव :** तालुक्यातील भीमाशंकर व जुन्नर तालुक्यातील विघ्नहर सहकारी साखर कारखान्यांचा गळीत हंगाम अंतिम टप्प्यात पोहोचला असून ऊसाच्या वाढ्यांना मोठी मागणी निर्माण झाली आहे. ऊस तोडणी अंतिम टप्प्यात आल्याने वाढ्यांचा तुटवडा जाणवू लागला असून बाजारभावात लक्षणीय वाढ झाली आहे. यामुळे ऊसतोड मजुरांनाही वाढीव दराचा आर्थिक फायदा होत आहे.

सध्या आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागातील लोणी-धामणी परिसरात हिरव्या चाऱ्याची टंचाई जाणवत आहे. ओढे-नाले कोरडे पडले असून विहिरींची पाणीपातळी खोल गेल्याने हिरवा चारा झपाट्याने कमी होत आहे. परिणामी, ज्या ठिकाणी ऊस तोडणी सुरू आहे त्या ठिकाणी वाढ्यांची खरेदी-विक्री जोमात सुरू आहे.

एक महिन्यापूर्वी २५ ते ३० पेंढ्या शंभर रुपयांना मिळत होत्या; मात्र सध्या १२ ते १६ पेंढ्यांना शंभर रुपये असा दर झाला आहे. ऊस तोडणी कमी होत गेल्याने वाढ्यांच्या किमती वाढल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले.

फेब्रुवारीतच चाऱ्याची कमतरता जाणवू लागल्याने मार्च, एप्रिल व मे महिन्यांत हिरवा चारा मिळवण्यासाठी मोठी कसरत करावी लागणार असल्याची भीती दुग्ध उत्पादक शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे.

### मराठी राजभाषा दिनानिमित्त चाळकवाडी ते नाणेघाट भाषा दिंडी

**पिंपळवंडी :** मराठी राजभाषा गौरव दिनानिमित्त चाळकवाडी (ता. जुन्नर) येथे तेहतीसाव्या शिवांजली साहित्य महोत्सवाचे आयोजन करण्यात आले. यानिमित्ताने चाळकवाडी ते नाणेघाट व पुन्हा नाणेघाट ते चाळकवाडी अशी मराठी भाषा दिंडी उत्साहात काढण्यात आली. महाराष्ट्र साहित्य परिषद, शिवांजली साहित्यपीठ तसेच अखिल भारतीय मराठी बालकुमार साहित्य संस्था (चाळकवाडी, पिंपळवंडी व भोसरी शाखा) यांच्या संयुक्त विद्यमाने गेली ३२ वर्षे हा उपक्रम सातत्याने राबविला जात आहे. दिंडीचे उद्घाटन जिल्हा परिषद सदस्य मंगेश काकडे यांच्यासह मान्यवरांच्या उपस्थितीत झाले. सोमतवाडी येथे दिंडीचे स्वागत करण्यात आले. नाणेघाट येथे हजारो वर्षांपूर्वीच्या मराठी भाषेच्या आद्य शिलालेखाचे पूजन करण्यात आले. घाटघर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र गीत सादर करून वातावरण भारावून टाकले.

# शिवकालीन सन्मानासाठी मुलींनी निर्भय बनले पाहिजे – रविंद्र भोर

### शरदचंद्र पवार कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगमध्ये 'निर्भय कन्या अभियान' अंतर्गत व्याख्यान

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**आळेफाटा :** बनकारफाटा (प्रतिनिधी) : छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात स्त्रियांना मिळणारा सन्मान आजच्या समाजातही टिकवण्यासाठी प्रत्येक मुलीने निर्भय, सक्षम आणि आत्मविश्वासी बनले पाहिजे, असे प्रतिपादन चाईल्ड फंड इंडिया चे ब्रँड अँबॅसिडर व करिअर मार्गदर्शक रविंद्र भोर यांनी केले. डुंबरवाडी (ता. जुन्नर) येथील गजानन महाराज शिक्षण प्रसारक मंडळाच्या शरदचंद्र पवार कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगमध्ये 'निर्भय कन्या अभियान' अंतर्गत आयोजित व्याख्यानात ते बोलत होते.

भोर यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या चरित्रातील स्त्री सन्मान, धैर्य आणि न्यायनिष्ठा या गुणांचा आदर्श विद्यार्थिनींसमोर ठेवला. महिला सबलीकरण, व्यक्तिमत्व विकास, स्त्री-पुरुष समानता, समान संधी, लिंगभाव जागृती, विवाहपूर्व समुपदेशन, सामाजिक व कौटुंबिक सुसंवाद, तसेच स्त्री हक्क व संवैधानिक अधिकार यांवर त्यांनी सविस्तर मार्गदर्शन केले.

स्त्रियांविरुद्ध होणाऱ्या मानसिक, शारीरिक व सामाजिक अत्याचारांविरोधात जागरूक राहून त्याला प्रतिकार करण्याचे आवाहनही त्यांनी केले. कार्यक्रमास प्राचार्य डॉ. गोविंद खरात, तायक्वांदो राष्ट्रीय रेफरी किरण जयकर, क्रीडा शिक्षिका आरती बनसोडे, प्रा. निता बाणखेले, प्रा. मोनिका रोकडे, प्रा. पूजा घोलप, प्रा. पूजा निघोजकार आदी मान्यवर उपस्थित होते. विद्यार्थिनींना बौद्धिक, मानसिक, भावनिक व शारीरिकदृष्ट्या सक्षम आणि निर्भय बनविण्यासाठी हे व्याख्यान मोलाचे ठरेल, अशी प्रतिक्रिया प्राचार्य डॉ. खरात यांनी व्यक्त केली.

### सीएफटीआय व अ‍ॅटलास कार्पो ग्रुपचा उपक्रम; शाळेच्या सायकल बँकेला बळ

# लाखणगाव येथील विद्यार्थिनींना मोफत सायकलींचे वाटप

■ दैनिक राज्य लोकतंत्र



लाखणगाव (ता. आंबेगाव) येथील न्यू इंग्लिश स्कूलच्या तेरा विद्यार्थिनींना मोफत सायकलींचे वितरण करताना मान्यवर.

**पुणे :** खेड तालुक्यातील कडूस येथे पंढरी लॉन्समध्ये आयोजित कार्यक्रमात लाखणगाव (ता. आंबेगाव) येथील न्यू इंग्लिश स्कूलच्या इयत्ता आठवीतील तेरा विद्यार्थिनींना मोफत सायकलींचे वाटप करण्यात आले. सेंटर फॉर ट्रान्सफॉर्मिंग इंडिया (मुंबई) आणि अ‍ॅटलास कार्पो ग्रुप (स्वीडन) यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम राबविण्यात आला. या सायकली शाळेच्या 'सायकल बँक' उपक्रमासाठी देण्यात आल्या असल्याची माहिती मुख्याध्यापक अनिल देसले यांनी दिली.

कार्यक्रमास शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष नवनाथ गाडगे, उपाध्यक्ष प्रदीप रोडे पाटील, उपशिक्षिका कल्पना राजगुरु, मुख्याध्यापक अनिल देसले, मनोज पाटील यांच्यासह विद्यार्थिनी उपस्थित होत्या. सीएफटीआयचे प्रमुख राहुल देशपांडे यांनी विद्यार्थिनींना शाळेत येण्या-जाण्यासाठी भविष्यात अधिक मदत करण्याचे आश्वासन दिले. तसेच अ‍ॅटलास कार्पोच्या अधिकाऱ्यांनी पुढील काळात आणखी सायकली उपलब्ध करून देण्याचे संकेत दिले.

शाळेत विविध फाउंडेशनच्या माध्यमातून विद्यार्थ्यांसाठी आधुनिक शैक्षणिक सुविधा उभारल्या जात असून, सीएफटीआयच्या सहभागामुळे या उपक्रमाला अधिक बळ मिळाले आहे. भविष्यातही विद्यार्थ्यांसाठी अत्याधुनिक सुविधा निर्माण करण्याचा मानस असल्याचे मुख्याध्यापक देसले यांनी सांगितले.

# भिगवण अपहरण प्रकरणाला नवे वळण; तरुणीने प्रेमसंबंधाचा दावा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**भिगवण :** भिगवण बाजारपेठेतून १ वर्षीय तरुणीच्या कथित अपहरण प्रकरणाने काही दिवसांपूर्वी जिल्ह्यात मोठी खळबळ उडवली होती. मात्र न्यायालयीन घडामोडींनंतर या प्रकरणाला आता नवे वळण मिळाले आहे.

लग्न अवघ्या दोन दिवसांवर असताना आई व भावासोबत खरेदी करून परतत असताना तरुणीचे अपहरण झाल्याचा आरोप कुटुंबीयांनी केला होता. आई व भावाच्या डोळ्यांत मिरचीपूड टाकून तिला जबरदस्तीने नेण्यात आल्याचा दावा करण्यात आला होता. या घटनेनंतर संतप्त नागरिकांनी पुणे–सोलापूर राष्ट्रीय महामार्ग रोखत आंदोलन केले. भिगवण बंदची हाक देण्यात आली होती. काही संघटनांनी आरोपींना तात्काळ अटक करण्याची मागणी करत आक्रमक भूमिका घेतली होती. दरम्यान, संबंधित तरुणीचा एक व्हिडिओ समोर आला. त्यामध्ये तिने "माझे अपहरण झाले नाही. मी संबंधित तरुणासोबत स्वेच्छेने आले असून आमचे प्रेमसंबंध आहेत," असा दावा केला. त्यानंतर दोघेही पोलिसांसमोर हजर झाले. न्यायालयात जबाब नोंदवताना सुरुवातीला तिने आईसोबत जाण्यास नकार दिल्याने तिला सुधारगृहात पाठवण्यात आले.

मात्र सुधारगृहात काही दिवस राहिल्यानंतर व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे झालेल्या सुनावणीत तिने आई व मामाकडे जाण्याची तयारी दर्शवली. या बदलत्या भूमिकेमुळे प्रकरणाबाबत नवे प्रश्न निर्माण झाले असून पोलिसांकडून सर्व बाजूंनी तपास सुरू आहे. न्यायालयाच्या पुढील आदेशाकडे परिसराचे लक्ष लागले आहे.

दैनिक राज्य लोकतंत्र

# देश-विदेश



## सारांश वृत्त

### आसाममध्ये बंदी घातलेल्या गोळ्या जप्त

**गुवाहाटी:** आसामचे मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा म्हणाले की, राज्य पोलिसांनी केलेल्या दोन वेगवेगळ्या कारवाईत सुमारे ४ कोटी रुपयांच्या बंदी असलेल्या याबा टॅब्लेट आणि दारूची तस्करी केल्याच्या आरोपाखाली तीन जणांना अटक करण्यात आली आहे. यशस्वी कारवाईबद्दल त्यांनी पोलिस कर्मचाऱ्यांचे कौतुक केले. "गाड्यांमधील लपलेले डबे गुन्हा लपवू शकत नाहीत," असे सरमा यांनी गुरुवारी एक्सवरील एका पोस्टमध्ये म्हटले आहे.

### आंध्रमध्ये नवविवाहित पुरूषाची हत्या

**राजमहेंद्रवरम (आंध्र प्रदेश) :** पूर्व गोदावरी जिल्ह्यातील द्वारपुडी गावात एका नवविवाहित पुरूषाची त्याच्या पत्नीच्या भावांनीच ऑनर किलिंगच्या संशयास्पद प्रकरणात हत्या केल्याची माहिती पोलिस अधिकाऱ्याने दिली. राजमहेंद्रवरम पूर्व विभागाचे पोलिस उपअधीक्षक बी दिव्या म्हणाले की, सूर्यप्रकाश यांच्यावर गुरुवारी रात्री उशिरा हल्ला करण्यात आला जिथे त्यांनी संध्या यांच्याशी लग्न केले होते. "गुरुवारी रात्री द्वारपुडी गावात नवविवाहित पुरूषाची दगडांनी हल्ला केल्यानंतर त्याला ऑनर किलिंगमध्ये ठार मारण्यात आले," असे दिव्या यांनी सांगितले.

### खाण अधिकाऱ्यांना चिरडण्याचा प्रयत्न

**बलिया (उत्तर प्रदेश):** बलिया येथे अंमलबजावणी मोहिमेदरम्यान जिल्हा खाण अधिकाऱ्यांना कारने चिरडण्याचा प्रयत्न केल्याबद्दल पोलिसांनी पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे, असे अधिकाऱ्यांनी शुक्रवारी सांगितले. जिल्हा खाण अधिकारी सौरभ कुमार यांच्या तक्रारीवरून गुरुवारी बलिया कोतवाली पोलिस ठाण्यात कमलेश यादव, सोनू यादव, राहुल वर्मा, आशुतोष आणि एका अज्ञात व्यक्तीविरुद्ध एफआयआर दाखल करण्यात आला. या पाच जणांवर भारतीय न्याय संहिता अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला.

## युद्धाची घोषणा, सीमारेषेवर भीषण चकमकी

# पाकिस्तान-अफगाणिस्तान संघर्ष तीव्र

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली :** भारताच्या शेजारील पाकिस्तान आणि अफगाणिस्तान यांच्यातील सीमा वादाने गंभीर लष्करी संघर्षाचे रूप धारण केले असून पाकिस्तानचे संरक्षण मंत्री ख्वाजा आसिफ यांनी अफगाणिस्तानविरुद्ध युद्धाची घोषणा केली आहे. ड्युरंड रेषेवरील वाढत्या चकमकींमुळे संपूर्ण प्रदेशात तणाव वाढला आहे.

गेल्या आठवड्यात पाकिस्तानने केलेल्या हवाई हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून गुरुवारी रात्री अफगाणिस्तानने प्रतिहल्ला सुरू केल्याने संघर्ष तीव्र झाला. काबूलने दावा केला की ड्युरंड रेषेवर सुमारे ५५ पाकिस्तानी सैनिक ठार झाले असून १५ हून अधिक पाकिस्तानी चौक्या ताब्यात घेण्यात आल्या आहेत.

याला प्रत्युत्तर म्हणून पाकिस्तानने "ऑपरेशन गझ्ब-लिल-हक" सुरू करत अफगाणिस्तानातील विविध ठिकाणी मोठे हवाई हल्ले केले. पाकिस्तानने या कारवाईत १३० हून अधिक तालिबानी लढवय्ये ठार झाल्याचा दावा केला आहे. शुक्रवारी पहाटे काबूल, कंधार आणि पक्तिया येथे बॉम्बहल्ले करण्यात आल्याची माहिती समोर आली.

संघर्षादरम्यान दोन्ही देशांकडून मोठे दावे करण्यात येत आहेत. पाकिस्तानने १३३ अफगाण सैनिक ठार केल्याचा दावा केला, तर अफगाणिस्तानने आपल्या हल्ल्यांत ५५ पाकिस्तानी सैनिक मारल्याचे म्हटले आहे. कंधार परिसरात पाकिस्तानी हवाई दलाची विमाने गस्त घालत असल्याचे स्थानिक माध्यमांनी वृत्त दिले.

दरम्यान, तोरखम सीमेजवळील ओमारी कॅम्पवर मोर्टार हल्ला झाल्याची घटना घडली असून त्यात सात निर्वासित जखमी झाले आहेत. जखमींमध्ये एका महिलेची प्रकृती गंभीर असल्याची माहिती नांगरहार प्रांतातील अधिकाऱ्यांनी दिली.

या वाढत्या संघर्षावर आंतरराष्ट्रीय समुदायाने चिंता व्यक्त केली आहे. चीनने परिस्थितीबाबत तीव्र चिंता व्यक्त करत मध्यस्थी करण्याची तयारी दर्शवली आहे. चीनच्या परराष्ट्र मंत्रालयाच्या प्रवक्त्या माओ निंग यांनी दोन्ही देशांतील तणाव कमी करण्यासाठी संवादाची गरज अधोरेखित केली.

संयुक्त राष्ट्रांनीही दोन्ही देशांना संयम बाळगण्याचे आणि आंतरराष्ट्रीय तसेच मानवतावादी कायद्याचे पालन करण्याचे आवाहन केले आहे. अफगाणिस्तानसाठी संयुक्त राष्ट्रांचे विशेष प्रतिनिधी रिचर्ड बेनेट यांनी शांततेच्या दिशेने पावले उचलण्याचे आवाहन केले. रशियानेही या संघर्षात मध्यस्थी करण्याची ऑफर दिली असून दोन्ही देशांशी संवाद साधण्याची तयारी दर्शवली आहे.

दरम्यान, युद्धापूर्वी भारताने अफगाणिस्तानच्या भूभागावर पाकिस्तानने केलेल्या हवाई हल्ल्यांचा तीव्र निषेध नोंदवला होता. भारताने अफगाणिस्तानच्या सार्वभौमत्व आणि प्रादेशिक अखंडतेला पाठिंबा असल्याचे स्पष्ट केले होते. रमजानच्या पवित्र महिन्यात नागरिकांचा बळी गेल्याबद्दल भारताने चिंता व्यक्त केली होती. सध्याच्या परिस्थितीत सीमावर्ती भागात लष्करी हालचाली वाढल्या असून संघर्ष आणखी तीव्र होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## कोलकात्यात भूकंपाचे धक्के; रिश्टर स्केलवर तीव्रता ५.०



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**कोलकाता :** पश्चिम बंगालची राजधानी कोलकाता येथे शुक्रवारी दुपारी भूकंपाचे जोरदार धक्के जाणवले. भूकंपानंतर नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून अनेकजण घरांबाहेर आणि कार्यालयीन इमारतींमधून बाहेर पडले.

अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, दुपारी सुमारे १:२२ वाजता भूकंपाचे धक्के जाणवले. रिश्टर स्केलवर भूकंपाची तीव्रता ५.० इतकी नोंदवण्यात आली आहे. भूकंपाचे केंद्र बांगलादेशातील खुलना शहरापासून सुमारे २६ किलोमीटर अंतरावर असल्याचे सांगण्यात आले.

धक्के काही काळ जाणवत राहिल्यामुळे अनेक ठिकाणी कार्यालये तात्पुरती रिकामी करण्यात आली. नागरिकांनी सुरक्षिततेच्या दृष्टीने इमारतीबाहेर थांबणे पसंत केले.

सध्यापर्यंत कोणतीही जीवितहानी किंवा मालमत्तेचे नुकसान झाल्याचे वृत्त समोर आलेले नाही, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

भूकंपानंतर नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण असून तज्ज्ञांच्या मते, मुख्य धक्क्यानंतर काही वेळा सौम्य आफ्टरशॉक्स जाणवण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे नागरिकांनी सतर्क राहण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

## पोटगी प्रकरणात न्यायालयाची कठोर भूमिका

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** पोटगीशी संबंधित एका प्रकरणाच्या सुनावणीदरम्यान सर्वोच्च न्यायालयाने पतीच्या उत्पन्नाविषयी संशय व्यक्त करत कठोर भूमिका घेतली. पतीने आपण दिवसाला केवळ ३२५ रुपये कमावतो असा दावा केल्यानंतर न्यायालयाने तो दावा अविश्वसनीय असल्याचे निरीक्षण नोंदवले.

शुक्रवारी झालेल्या सुनावणीत न्यायालयाने दरमहा १०,००० रुपये पोटगी देण्याचा आदेश देण्याचा विचार व्यक्त केला. मात्र, पतीच्या वकिलांनी ही रक्कम देणे परवडणार नसल्याचे सांगितले. त्यांनी प्रतिज्ञापत्राद्वारे संबंधित उत्पन्न सिद्ध करण्यास कार्यालयातील सहकारी तयार असल्याचेही न्यायालयाला सांगितले. यावर न्यायालयाने टिप्पणी करत, "मग पत्नीला तुमच्यासोबत ठेवा. ती तुमच्यासाठी आणि मुलांसाठी स्वयंपाक करेल," असे म्हटले. त्यावर पतीच्या वकिलांनी पत्नीने त्यांच्या पालकांविरोधातही तक्रार दाखल केल्याचे सांगत वैवाहिक नातेसंबंध टिकतील की नाही याबाबत अनिश्चितता व्यक्त केली.

यानंतर न्यायालयाने संबंधित कंपनीलाच नोटीस देण्याचा इशारा देत, कमी वेतन दिल्याचा मुद्दा तपासण्यासाठी कंपनीकडून शपथपत्र मागवण्याची तयारी दर्शवली. पतीच्या वकिलांनी या भूमिकेला सहमती दर्शवत, यामुळे इतर कर्मचाऱ्यांनाही फायदा होईल, असे म्हटले. सुनावणीअंती सर्वोच्च न्यायालयाने आपला अंतिम आदेश राखून ठेवला.

दरम्यान, पोटगीसंदर्भातील आणखी एका प्रकरणात दिल्ली उच्च न्यायालयाने अलीकडेच महत्त्वपूर्ण निरीक्षण नोंदवले होते. गृहिणीला "निष्क्रिय" मानणे हा घरगुती कामाच्या स्वरूपाचा गैरसमज असल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले. न्यायमूर्ती स्वरण कांता शर्मा यांनी दिलेल्या निकालात, गृहिणीचे योगदान कमावत्या जोडीदाराला काम करण्यास सक्षम बनवणारे असल्याचे नमूद करत पत्नीची याचिका मंजूर केली.

## मोदींच्या भाषणावरून काँग्रेस-भाजप आमनेसामने

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी इस्रायलच्या संसदेतील नेसेटमध्ये केलेल्या भाषणावर काँग्रेसने केलेल्या टीकेला भाजपने गुरुवारी जोरदार प्रत्युत्तर दिले. विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांचे वय वाढत असून पंतप्रधान होण्याची शक्यता दिसत नसल्यामुळे ते नाराज असल्याचा आरोप भाजपने केला.

भाजपचे राष्ट्रीय प्रवक्ते संबित पात्रा यांनी पत्रकार परिषदेत बोलताना राहुल गांधी आणि त्यांचे कुटुंब "पूर्णपणे तडजोड केलेले" असल्याचा आरोप केला. तसेच देशाचे पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांनी भारतीय भूभाग चीन आणि पाकिस्तानला का "भेट" दिला, याचे स्पष्टीकरण काँग्रेसने द्यावे, अशी मागणीही त्यांनी केली.

देशासाठी आणि पंतप्रधानांसाठी सकारात्मक घडामोडी झाल्या की काँग्रेससाठी ती नेहमीच वाईट बातमी ठरते, असा टोला पात्रा यांनी लगावला. नेसेटमधील भाषणादरम्यान पंतप्रधान मोदी यांना उभे राहून टाळ्यांचा कडकडाट मिळाला, ही देशासाठी अभिमानाची बाब असल्याचे त्यांनी सांगितले.

"तेथे 'मोदी, मोदी' अशा घोषणा देण्यात आल्या. त्या कोणाच्याही सांगण्यावरून नव्हत्या, तर इस्रायलच्या लोकांकडून आलेली उत्स्फूर्त प्रतिक्रिया होती. ही भारतातील १४० कोटी जनतेचे प्रतिनिधित्व करणाऱ्या पंतप्रधानांबद्दलची भावना होती," असे पात्रा म्हणाले. मोदी यांना 'नेसेटचे अध्यक्ष' पदकही प्रदान करण्यात आल्याचा त्यांनी दावा केला.

काँग्रेस या सर्व घडामोडींमुळे दुःखी असल्याचा आरोप करताना पात्रा म्हणाले की, राहुल गांधी यांना सत्तेचे सिंहासन हवे आहे; मात्र ते त्यांना मिळणार नाही. "काँग्रेस नाराज आहे, त्यांना नाराज राहू द्या," असा टोमणाही त्यांनी लगावला.

राहुल गांधी यांनी पंतप्रधानांवर केलेल्या "तडजोड" या टीकेला उत्तर देताना पात्रा यांनी काँग्रेस नेतृत्वावरच प्रतिआरोप केले. जवाहरलाल नेहरू यांनी संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेत कायमस्वरूपी सदस्यत्वाची संधी नाकारली होती आणि भारताने ती स्वीकारली असती तर चीन नाराज झाला असता, असा दावा त्यांनी यावेळी केला.

## न्यायिक अधिकारी प्रभावाखाली येणार नाहीत...

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** पश्चिम बंगालमधील मतदार यादीच्या विशेष सघन पुनरावृत्ती (एसआयआर) प्रक्रियेबाबत सर्वोच्च न्यायालयाने शुक्रवारी स्पष्ट शब्दांत भूमिका मांडत न्यायिक अधिकारी कोणत्याही प्रभावाखाली येणार नाहीत, असा विश्वास व्यक्त केला. राज्य सरकारने न्यायिक अधिकाऱ्यांसाठी प्रशिक्षण मॉड्यूल जारी केल्याचा मुद्दा न्यायालयात उपस्थित करण्यात आला होता.

पश्चिम बंगाल सरकारतर्फे वरिष्ठ वकील कपिल सिब्बल यांनी सरन्यायाधीश सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जयमाल्या बागची यांच्या खंडपीठासमोर हा मुद्दा मांडला. कलकत्ता उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश आणि संबंधित समितीमार्फत प्रक्रिया ठरवण्याचे निर्देश असतानाही न्यायिक अधिकाऱ्यांना स्वतंत्रपणे मार्गदर्शक सूचना देण्यात आल्याचा आरोप त्यांनी केला. यावर सरन्यायाधीशांनी स्पष्ट केले की, या प्रक्रियेत नियुक्त न्यायिक अधिकारी स्वतंत्रपणे निर्णय घेतील.

न्यायमूर्ती जयमाल्या बागची यांनीही न्यायालयाचे आदेश "सूर्यप्रकाशाइतके स्पष्ट" असल्याचे सांगितले. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशांच्या चौकटीबाहेर निवडणूक आयोग किंवा राज्य सरकार जाणार नाही, असेही खंडपीठाने स्पष्ट केले.

राज्य सरकार आणि निवडणूक आयोग यांच्यात सुरू असलेल्या वादाच्या पार्श्वभूमीवर सर्वोच्च न्यायालयाने २० फेब्रुवारी रोजी एसआयआर प्रक्रियेस मदत करण्यासाठी कार्यरत व माजी जिल्हा न्यायाधीशांची नियुक्ती करण्याचे निर्देश दिले होते. त्यानंतर २४ फेब्रुवारी रोजी न्यायालयाने २५० जिल्हा न्यायाधीशांव्यतिरिक्त पश्चिम बंगालमधील दिवाणी न्यायाधीशांची नियुक्ती करण्यास परवानगी दिली.

## सर्वोच्च न्यायालय कॉलेजियमचे नवे धोरण

# नियुक्ती प्रक्रियेत मोठा बदल

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली :** देशातील विविध उच्च न्यायालयांच्या मुख्य न्यायाधीशांच्या नियुक्ती आणि पदभार स्वीकारण्याच्या प्रक्रियेत सर्वोच्च न्यायालयाच्या कॉलेजियमने महत्त्वपूर्ण बदल करण्याचा निर्णय घेतला आहे. नव्या धोरणानुसार, संबंधित उच्च न्यायालयातील मुख्य न्यायाधीश पद रिक्त होण्याच्या सुमारे दोन महिने आधी भावी मुख्य न्यायाधीशांची त्या न्यायालयात बदली करण्यात येणार आहे.

कॉलेजियमच्या मते, अचानक पदभार स्वीकारण्याऐवजी भावी मुख्य न्यायाधीशांना आधीच त्या न्यायालयात काम करण्याची संधी दिल्यास त्यांना न्यायालयाचे कामकाज, प्रशासकीय रचना तसेच स्थानिक न्यायविषयक आव्हाने समजून घेण्यासाठी पुरेसा वेळ मिळेल.

कॉलेजियमने जारी केलेल्या अधिकृत नोटमध्ये नमूद करण्यात आले आहे की, प्रस्तावित न्यायाधीशांना संबंधित उच्च न्यायालयाच्या कारभाराची सखोल माहिती मिळावी आणि मुख्य न्यायाधीशपदाची जबाबदारी स्वीकारल्यानंतर कोणत्याही व्यत्ययाशिवाय काम सुरू करता यावे, हा या निर्णयामागील मुख्य उद्देश आहे.

अनेकदा एका मुख्य न्यायाधीशाच्या निवृत्ती आणि नव्या मुख्य न्यायाधीशाच्या पदभार स्वीकारण्यादरम्यान प्रशासकीय कामकाजात मंद गती येत असल्याचे दिसून आले आहे. नव्या व्यवस्थेमुळे नेतृत्व संक्रमण अधिक सुरळीत होईल आणि न्यायालयीन कामकाजात खंड पडणार नाही, असा विश्वास कॉलेजियमने व्यक्त केला आहे. यामुळे न्यायालयीन प्रशासनाची कार्यक्षमता वाढून न्याय वितरणाची गुणवत्ता सुधारण्यास मदत होईल, असेही नमूद करण्यात आले आहे.

या नव्या धोरणाच्या अंमलबजावणीचा भाग म्हणून कॉलेजियमने पंजाब आणि हरियाणा उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्ती लिसा गिल यांची आंध्र प्रदेश उच्च न्यायालयात बदली करण्याची शिफारस केली आहे.

केंद्र सरकारने शिफारस मंजूर केल्यास न्यायमूर्ती गिल प्रारंभी दोन महिने आंध्र प्रदेश उच्च न्यायालयात कार्यरत राहतील. त्यानंतर २५ एप्रिल २०२६ रोजी त्या अधिकृतपणे आंध्र प्रदेश उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशपदाची सूत्रे स्वीकारतील.

## केजरीवाल, सिसोदिया यांची निर्दोष मुक्तता

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** दिल्ली उत्पादन शुल्क धोरण प्रकरणात दिल्लीचे माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल, माजी उपमुख्यमंत्री मनीष सिसोदिया आणि इतर २१ जणांना विशेष न्यायालयाने निर्दोष मुक्त केले आहे. पुराव्यांचा अभाव आणि तपासातील गंभीर त्रुटींचा उल्लेख करत न्यायालयाने केंद्रीय अन्वेषण ब्युरोच्या (सीबीआय) आरोपपत्राची दखल घेण्यास नकार दिला.

शुक्रवारी दिलेल्या आदेशात विशेष न्यायालयाने नमूद केले की, सीबीआयने सादर केलेल्या आरोपपत्रात अनेक त्रुटी असून खटला चालवण्यासाठी आवश्यक ठोस पुरावे उपलब्ध नाहीत. त्यामुळे सर्व २३ आरोपींना दोषमुक्त करण्यात आले. विशेष न्यायाधीश जितेंद्र सिंह यांनी निरीक्षण नोंदवताना सांगितले की, सादर करण्यात आलेले पुरावे रद्द करण्यात आलेल्या उत्पादन शुल्क धोरणाशी संबंधित कथित भ्रष्टाचार प्रकरणात खटला चालवण्यासाठी पुरेसा आधार निर्माण करण्यात अपयशी ठरले. न्यायालयाने आरोपपत्रातील "दिशाभूल करणाऱ्या विधानां"कडेही लक्ष वेधले. मोठ्या प्रमाणातील कागदपत्रांमध्ये अनेक त्रुटी असून त्या ना पुराव्यांनी सिद्ध झाल्या ना साक्षीदारांच्या साक्षींनी पुष्टी झाल्याचे न्यायालयाने नमूद केले. "आरोपपत्रात अंतर्गत विरोधाभास आहेत, जे कथित कटाच्या सिद्धांतालाच कमकुवत करतात," असे न्यायाधीश सिंह यांनी आदेशात म्हटले आहे.

केजरीवाल यांच्याविरोधातील आरोपांविषयी न्यायालयाने स्पष्ट केले की, पुराव्यांच्या अभावामुळे त्यांच्यावरचे आरोप सिद्ध होऊ शकत नाहीत. ठोस पुराव्याशिवाय एखाद्या व्यक्तीला प्रकरणात गोवणे हे कायद्याच्या मूलभूत तत्त्वांशी विसंगत असल्याचेही न्यायालयाने नमूद केले. मनीष सिसोदिया यांच्या संदर्भात न्यायालयाने म्हटले की, कथित गुन्ह्यात त्यांचा सहभाग दर्शवणारी कोणतीही कागदपत्रे नोंदीवर उपलब्ध नाहीत आणि त्यांच्याकडून कोणतीही वसुली झाल्याचेही आढळले नाही.

दिल्लीतील आम आदमी पक्ष सरकारने लागू केलेल्या मद्य धोरणाच्या निर्मिती आणि अंमलबजावणीमध्ये अनियमितता झाल्याच्या आरोपांची सीबीआय चौकशी करत होती.

## होळीपूर्वी वेतन देण्याचे आदेश

**लखनौ :** उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी शुक्रवारी अधिकाऱ्यांना सर्व सरकारी कर्मचाऱ्यांचे पगार होळीपूर्वी वितरित करण्याचे निर्देश दिले आणि या संदर्भात कोणताही निष्काळजीपणा खपवून घेतला जाणार नाही असा इशारा दिला. सिंगापूर आणि जपान या दोन देशांच्या दौऱ्यावरून परतल्यानंतर मुख्यमंत्र्यांनी प्रशासनाला अनेक सूचना दिल्या. सर्व सरकारी कर्मचाऱ्यांचे पगार होळीपूर्वी देण्याचे निर्देश त्यांनी दिले.

## तामिळनाडू निवडणुका एकाच टप्प्यात घेण्याची मागणी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**चेन्नई :** तामिळनाडूतील राजकीय पक्षांनी विधानसभा निवडणुका एकाच टप्प्यात घेण्याचा सल्ला दिला असून सर्व घटकांचा विचार करून अंतिम निर्णय घेतला जाईल, अशी माहिती मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी शुक्रवारी दिली.

येथे आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना त्यांनी सांगितले की, मतदान टप्प्यांतून घ्यायचे की एकाच टप्प्यात, याबाबतचा निर्णय निवडणूक कार्यक्रम जाहीर करताना स्पष्ट केला जाईल.

तामिळनाडूमध्ये नुकत्याच पार पडलेल्या मतदार यादीच्या विशेष सघन पुनरावृत्ती (एसआयआर) प्रक्रियेचे त्यांनी कौतुक करत ती देशासाठी आदर्श ठरावी अशी यशस्वी मोहीम असल्याचे म्हटले.

राज्यातील सुमारे ७५,००० मतदान केंद्रांवर आवश्यक सर्व सुविधा उपलब्ध करून दिल्या जातील, असे आश्वासनही त्यांनी दिले. मतमोजणी प्रक्रियेबाबत माहिती देताना त्यांनी सांगितले की, व्हीव्हीपॅटची अनिवार्य पडताळणी केली जाणार आहे. तसेच मतमोजणी पूर्ण झाल्यानंतर कोणताही उमेदवार निर्धारित शुल्क भरून पुढील ७ दिवसांच्या आत ईव्हीएम आणि व्हीव्हीपॅटची जुळवणी करण्याची मागणी करू शकतो.

निवडणूक प्रक्रियेत नव्या उपक्रमांअंतर्गत ईव्हीएमच्या फेऱ्या सुरू होण्यापूर्वी पोस्टल मतपत्रिकांची मोजणी दोन फेऱ्यांमध्ये केली जाणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

## पाणबुडीविरोधी क्षमतेत वाढ; 'डॉल्फिन हंटर' म्हणून कार्य करणार

# नौदलात आयएनएस अंजदीप युद्धनौकेचा समावेश

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**चेन्नई :** भारतीय नौदलाने शुक्रवारी आयएनएस अंजदीप ही अत्याधुनिक युद्धनौका औपचारिकरीत्या कार्यान्वित केली.

पाणबुडीविरोधी युद्ध क्षमता मजबूत करणे आणि किनारी देखरेख वाढवणे हा या युद्धनौकेचा प्रमुख उद्देश आहे. नौदल प्रमुख ॲडमिरल दिनेश के. त्रिपाठी यांच्या हस्ते चेन्नई बंदरात झालेल्या समारंभात जहाजाचे कमिशनिंग करण्यात आले.

आयएनएस अंजदीप हे 'अँटी-सबमरीन वॉरफेअर शॅलो वॉटर क्राफ्ट' प्रकल्पांतर्गत बांधण्यात येणाऱ्या आठ जहाजांपैकी तिसरे जहाज आहे. किनारी आणि उथळ पाण्यात शत्रूच्या पाणबुड्यांचा शोध घेणे, त्यांचा पाठलाग करणे आणि आवश्यक असल्यास त्यांचा नाश करणे, या उद्देशाने या युद्धनौकेची रचना करण्यात आली असून ते 'डॉल्फिन हंटर' म्हणून कार्य करणार आहे.

वरिष्ठ नौदल अधिकारी आणि सरकारी प्रतिनिधींच्या उपस्थितीत पार पडलेल्या समारंभात या जहाजाचा औपचारिक ताफ्यात समावेश करण्यात आला.

अधिकृत माहितीनुसार, ७७ मीटर लांबीच्या या जहाजात हाय-स्पीड वॉटर-जेट प्रोपल्शन प्रणाली बसवण्यात आली आहे. त्यामुळे जहाजाला जलद प्रतिसाद देणे शक्य होत असून ते कमाल २५ नॉट्स वेगाने प्रवास करू शकते.

कोलकातास्थित गार्डन रीच शिपबिल्डर्स अँड इंजिनिअर्स यांनी ही युद्धनौका बांधली आहे. किनारी आणि उथळ समुद्री भागातील आव्हानात्मक ऑपरेशन्स लक्षात घेऊन जहाजाची निर्मिती करण्यात आली असून राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीने ते महत्त्वाचे मानले जात आहे.

पाणबुडीविरोधी मोहिमांबरोबरच हे जहाज किनारी देखरेख, कमी तीव्रतेच्या सागरी कारवाया तसेच शोध आणि बचाव मोहिमा पार पाडण्यास सक्षम आहे. जहाजात स्वदेशी पाणबुडीविरोधी शस्त्रसज्जता, 'सोनार अभय' सेन्सर प्रणाली, हलके टॉर्पेडो आणि पाणबुडीविरोधी रॉकेट्स बसवण्यात आले आहेत.

"अंजदीप" हे नाव कर्नाटकातील कारवार किनाऱ्याजवळील अंजदीप बेटावरून देण्यात आले आहे. या युद्धनौकेच्या समावेशामुळे भारताच्या सागरी हितसुरक्षेला बळ मिळणार असून तामिळनाडू आणि पुद्दुचेरीच्या किनारी भागांच्या संरक्षण क्षमतेतही वाढ होणार आहे.

नौदलातील जुन्या 'अभय-क्लास' जहाजांची जागा घेण्यासाठी ही स्वदेशी कॉर्वेट्स तयार करण्यात येत आहेत.

या प्रकल्पासाठी स्टील प्राधिकरणाने अंदाजे ३,५०० टन विशेष दर्जाचे स्टील पुरवले असून ते बोकारो, भिलाई आणि राउरकेला येथील एकात्मिक स्टील प्रकल्पांतून उपलब्ध करून देण्यात आले आहे.